जानेवारी २०१८

# साद

वर्ष : १ अंक : १




महाराष्ट्र राज्य महिला आयोग

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा



**विजया रहाटकर**

सदस्य



**नीता राजेंद्र ठाकरे**

सदस्य



**देवयानी ठाकरे**

सदस्य



**वृंदा कीर्तीकर**

सदस्य




**गयाताई शिवाजीराव कराड**

सदस्य



**ॲड. आशा लांडगे**

पदसिद्ध सदस्य



**सतीश माथूर**
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



**डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे**

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८
// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //
# साद

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
(म्हाडा इमारत)
कलानगर, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक
वसाहत, एस. जे. मार्ग,
लोअर परळ, मुंबई-४०० ०१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**स्वागत मूल्य : ₹ १०**

**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय



## ‘साद’ घालतांना...

महिला अशिक्षित असो किंवा शिकली सवरलेली असो, तिला घरात, नोकरीच्या ठिकाणी आणि एकूणच समाजात कुठे ना कुठे अन्यायाला, शोषणाला, असंख्य अडचणींना सामोरे जावेच लागते. अशा वेळी महिलांच्या मदतीला धावून जाण्याचे काम महाराष्ट्र राज्य महिला आयोग नेहमीच करीत आला आहे... ते ही अव्याहतपणे. आयोगाच्या सर्वंकष उपक्रमांवर नुसती नजर जरी टाकली तरी आयोगाने व्यापलेले अवकाश सहजपणे लक्षात येऊ शकते; पण दुर्दैवाने आयोगाचे महत्त्व, त्याचे असलेले अधिकार, महिलांचे हितसंवर्धन करतानाच कौटुंबिक धागे तुटू न देण्यासाठी करत असलेले प्रयत्न जनतेपर्यंत, दस्तुरखुद्द महिलांपर्यंत क्वचितच पोहोचते. नाही म्हणायला मुख्य प्रवाहातील माध्यमांचे आयोगाला सहकार्य नेहमीच मिळते; पण बहुतांश वेळा ते अपुरे ठरते. म्हणून असे वाटत होते, की आयोगाला स्वतःचे एक हक्काचे माध्यम व्यासपीठ हवेच आणि मग त्यातून ’साद’ आकारत गेले. महिला हितरक्षणांचे व्रत हाती घेतलेल्या आयोगाचा यंदा तर रौप्यमहोत्सव. ’साद’च्या शुभारंभाला या इतके उत्तम औचित्य दुसरे मिळाले नसते, म्हणूनच ही संधी साधून ’साद’चा अंक सर्वांच्या हाती देताना अतीव आनंद होत आहे.

महिला सक्षमीकरण आणि स्त्री-पुरुष समानता हे ’साद’चे मुख्य संपादकीय आणि वैचारिक उद्दिष्ट. आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे राहण्याइतपतच सक्षमीकरणाचा अर्थ संकुचित नाही. तो सर्वकष आणि व्यापक आहे. मानसिक, सांस्कृतिक, सामाजिक, उत्तम आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञानातील प्रगती, समप्रगतीसाठी स्त्रियांना अनुकूल पर्यावरण असे त्याचे कितीतरी पैलू आहेत. ’साद’च्या प्रत्येक अंकातून या पैलूंचा वेध घेतला जाईल. आर्थिक भान, महत्त्वाच्या कायद्यांची तपशीलवार माहिती यांच्यापासून ते जग कवेत घेऊ पाहणाऱ्या महिलांच्या यशोगाथा आणि आयोगाच्या ’खारीच्या प्रयत्नां’च्या माहितीपर्यंत खूप काही वैचारिक व पूरक माहितीचे सकस खाद्य देण्याचा ’साद’चा प्रयत्न राहील. एका अर्थाने हे आयोगाचे मुखपत्रच राहील. त्यात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक गोष्टींशी आयोग सहमतच असेलच, असेही नाही; पण ती काही मर्यादा नाही, बंधन नाही. जे जे उत्तम असेल आणि विचारांना दिशा देण्यासाठी पूरक असेल, असे उत्तमोत्तम लेखन ’साद’मध्ये आवर्जून समाविष्ट केले जाईल.

ही सुरुवात आहे आणि ’साद’चा दर्जा दिवसेंदिवस वाढविण्याचा प्रयत्न आवर्जून केला जाईल. ’साद’च्या निमित्ताने आयोगाचा वाचकस्नेह आणखी दृढ होत राहील, याची खात्री आहे. त्यामुळे दर महिन्याला आपण असेच भेटत राहू...

**विजया रहाटकर**, मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

| वाचकांना निवेदन | ‘साद’ हे महिला आयोगाचे मुखपत्र असले तरी, येथे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक लेखांशी आयोग सहमतच असेल, असे नाही. |
|---|---|

# अनुक्रमणिका

आयोगाने जिंकला महिलांचा विश्वास ........................................ ५
समान पोषण, समान शिक्षण ................................................ ११
कुपोषणमुक्ती हाच ध्यास ..................................................... १४
आता उजाडेल... .............................................................. १७
ऐतिहासिक पाऊल ............................................................. २०
महिला सक्षमीकरणातील सावित्रीबाईंचे योगदान .......................... २३
मैत्रीही टिकली, पैसेही मिळाले... ........................................... २७
सिगारेटच्या थोटकापायी.... ................................................... ३१
जबरदस्त 'पुश' ................................................................. ३४
गावकारभारीण – एक अनुभव................................................ ४१
कुटुंबाचे आर्थिक व्यवहारही समजून घ्या................................... ४५
महिलांसाठी उपयुक्त केंद्रीय योजना......................................... ४९
न्याय मिळाला...संसार वाचले................................................. ५२
लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, २०१३....................................... ५४
आशेचे किरण ................................................................... ६२
राज्य महिला आयोगाविषयी... ................................................ ६३

# आयोगाने जिंकला महिलांचा विश्वास



**देवेंद्र फडणवीस**, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र

**महिलांचा सर्वांगीण विकास साधल्याशिवाय राज्याचा विकास होणे शक्य नाही, हे लक्षात घेऊनच महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री देव्रेंद्र फडणवीस यांची 'साद'साठी विशेष मुलाखत...**



## महिलांच्या सक्षमीकरणाबाबत राज्य सरकारचे धोरण काय आहे?

ज्या समाजात महिलांचे स्थान उन्नत असते, महिलांचा सन्मान केला जातो, असा समाज प्रगतीची शिखरे गाठतो, अशा आशयाचे सुभाषित आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास साधल्याशिवाय राज्याचा विकास होणे शक्य नाही, हे लक्षात घेऊनच महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिलांना स्वयंरोजगार व आर्थिक सक्षमता मिळवून देण्यासाठी बचतगट हे प्रभावी माध्यम आहे. या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. बचतगटांची चळवळ बळकट करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम) विविध योजना आखण्यात आल्या आहेत. सुमारे पाच लाख बचतगटांच्या माध्यमातून ५० लाख कुटुंबांना लाभ देण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत.

सुमतीबाई सुकळीकर स्वयंसहाय्यता बचतगट अर्थसहाय्यता योजनेतून महिला बचतगटांना शासनाकडून शून्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येत

आहे. त्याचा फायदा अडीच लाख बचतगटांनी घेतला आहे. पूर्वी महिला बचतगटांना चार टक्के व्याजअनुदान दिले जायचे, सध्या शून्य टक्के दराने कर्ज देण्यात येत आहे. महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर आणि औरंगाबाद येथे बचतगट उत्पादनांच्या विक्रीसाठी स्वतंत्र मॉल उभे करण्यात येणार असून, महानगरांमध्ये असलेल्या मॉलमध्येही बचतगट उत्पादनांच्या विक्रीसाठी जागा उपलब्ध करुन देणे अनिवार्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. या शिवाय शासनाच्या उमेद या अभियानांतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महिला व युवक-युवती तसेच शेतमजूर, मजूर, भूमिहीन, कामगार आणि आदिवासी आदी कुटुंबातील किमान एका महिलेचा स्वयंसहाय्यता समूहामध्ये (बचतगटात) समावेश करण्यात येणार आहे. टाटा ट्रस्ट सोबत केलेल्या महत्त्वाकांक्षी करारातून महिला सक्षमीकरणाचा प्रयत्न होत आहे. विशेषत: ग्रामीण आणि दुर्गम भागातील महिला सक्षमीकरणासाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात येत आहेत.

## बेटी बचाओ-बेटी पढाओ यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा भर आहे. राज्यातील चित्र कसे रेखाटणार?

महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता आणि आरोग्य संवर्धनासाठी शासनातर्फे विविध योजना राबवल्या जातात. मुलीच्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी राबवण्यात येत असलेली केंद्र शासनाची बेटी बचाओ, बेटी पढाओ आणि राज्याची माझी कन्या भाग्यश्री या योजनांमुळे मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याकडे लोकांचा कल वाढतो आहे. बेटी बचाओ-बेटी पढाओ अभियानासाठी महाराष्ट्रातील औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, जालना, जळगाव, अहमदनगर, बुलडाणा, वाशीम, कोल्हापूर, सांगली या दहा जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. यात उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी जळगाव आणि उस्मानाबाद जिल्ह्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याकडून पहिल्याच वर्षी १५३ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षण मिळावे यासाठी विविध योजना आखण्यात आल्या आहेत. मुलींच्या सर्व वसतिगृहांभोवती



संरक्षक भिंती बांधण्यात येणार आहेत. यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद मागील अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्या दृष्टीने कामही सुरू झाले आहे. मागासवर्गीय मुलींसाठी ५० नवीन वसतिगृहे आणि पुणे, नागपूर व मुंबई येथे नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांकरिता तीन वसतिगृहे बांधण्यात येणार आहेत.

**महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांना आरक्षण मिळून २५ वर्षे झाली. राजकीयदृष्ट्या महिला किती सक्षम झाल्या असे वाटते?**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्याच्या निर्णयाचा परिणाम गावागावांमध्ये दिसतो आहे. गावाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला आहे. महिला आता गावाच्या विकासासाठी पुढाकार घेऊ लागल्या आहेत. महिला या मुळातच उत्कृष्ट व्यवस्थापक असतात. आपले घर आणि मुला-बाळांबरोबरच गृहिणी शेती, व्यवसाय, व्यापारात सक्रिय असतात. याच महिला आता आत्मविश्वासाने गावाचे निर्णय घेत आहेत. व्यावहारिकतेच्या पातळीवर घेतलेल्या या निर्णयांचे समाजावर निश्चित चांगले परिणाम बघायला मिळतात.या संदर्भात मला एक उदाहरण आठवते. बुलडाणा जिल्ह्यातल्या एका गावाच्या महिला सरपंचांनी ग्राम सभेत निर्णय घेतला की, यापुढे गावामध्ये लग्नाचा बस्ता बांधला जाणार नाही. बस्ता बांधणे म्हणजे वर पक्षाकडील मंडळींचा यथोचित मानपान करण्यासाठी कपडेलत्ते घेण्याची प्रथा असते. ते कपडे केवढ्याचे असावे, मुलीच्या वडिलांचे त्यासाठी किती बजेट आहे याचा विचार प्रसंगी मुलाकडची मंडळी करत नाहीत. त्यामुळे या प्रथेने मुलीकडच्यांवर कधी कधी आर्थिक संकट ओढवते. प्रसंगी कर्ज काढण्याची वेळ वधूपित्यावर येते, हे लक्षात घेऊन त्या महिला सरपंचाने बस्ता प्रथेला फाटा दिला होता. आश्चर्य म्हणजे या निर्णयाला संपूर्ण गावाने पाठिंबा दिला आणि ही प्रथा त्या गावापुरती तरी मोडीत निघाली. असे कित्येक निर्णय गावागावांत होत आहेत. गावांसाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्यांमध्ये महिलांची ५० टक्के असलेली संख्या पुरुषांवर एक नैतिक दबाव टाकणारी असते. त्यामुळे रस्ते, गावाचे विद्युतीकरण या समस्या तर सोडवल्या जात आहेतच पण पाणी, आरोग्य, शाळा यासंबंधी समस्यांवर कायमस्वरूपी उपाय योजले जात आहेत. समाजाचीही त्यांच्याकडे बघण्याची मानसिकता बदलते आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला लोकप्रतिनिधींच्या कामातील पुरुषांचा हस्तक्षेप कसा कमी करता येईल?**

सुरुवातीला महिला प्रतिनिधी जेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आल्या तेव्हाची परिस्थिती आणि आजची यात खूप बदल झाला आहे. या महिला प्रतिनिधींना गावांनी आता स्वीकारले आहे. पूर्वी महिला सरपंच दुसऱ्यांदा निवडणूक लढवण्यात फारशा उत्सुक नसत, पण आता तसे होत नाही. गावातील झेंडावंदनदेखील महिला प्रतिनिधी किंवा सरपंच यांच्या हस्ते कसे होणार नाही याकडे पुरुष प्रतिनिधी नजर ठेवून असायचे. पण या संदर्भातील शासनाच्या आदेशाने परिस्थिती बदलली आहे. महिला सरपंच आता झेंडावंदनाला जातात आणि सोबत गावातील इतर महिलांनाही आग्रहाने घेऊन जातात.

**प्रशिक्षणाच्या माध्यमातून कोणत्या गोष्टी साध्य होतील?**

पूर्वी महिला सरपंचांवर सर्रास अविश्वास ठराव आणले जायचे, पण आता हे प्रमाण कमी झाले आहे. असा बदल घडत असताना महिला प्रतिनिधींना प्रशिक्षित करुन त्यांचा सहभाग अधिक वाढवता येईल, यासाठी आग्रह धरला पाहिजे. महिला प्रतिनिधींना त्यांचे अधिकार कर्तव्ये यांची पुरेपूर माहिती असेल आणि त्या आत्मविश्वासपूर्वक कार्य करू लागल्या की पुरुषांचा किंवा इतरांचा त्यांच्या कामातील हस्तक्षेप आपोआपच कमी होईल. यासाठी महिलांना सरपंच मेळाव्यांसारख्या विविध माध्यमांतून प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. या शिवाय महिला प्रतिनिधींनीही गावासाठी कोणत्या योजना आहेत, त्यांचे निकष काय, प्रत्यक्षात योजनेचा लाभ घेण्यासाठी काय करावे लागेल अशी माहिती स्वत: घेतली पाहिजे. अनिष्ट परंपरा, गैरसमजुती यांच्या जोखडात न अडकता नवे तंत्र शिकले पाहिजे. आपण ग्रामपंचायतींचे संगणकीकरण करत आहोत. त्यामुळे या पुढील काळात



संगणकावर लोकप्रतिनिधींनाच काम करता येणे आवश्यक होणार आहे. हे लक्षात घेऊन समाजाच्या सर्व स्तरातून काम केले तर त्या नक्कीच यशस्वी होतील.

## महिला आयोगाच्या आजवरच्या कामगिरीबद्दल काय सांगाल?

एकूणच देशातील महिला समूहाचा विचार केला तर सध्याचा काळ हा संक्रमणाचा आहे असे म्हणावे लागेल. रोज नवे सामाजिक-आर्थिक बदल घडत आहेत. सर्व दिशांनी घडणाऱ्या या बदलांचा समाजमनावर परिणाम होतो. पारंपरिक कल्पना व समजुतींना छेद दिला जात असतानाच समाजही नवे बदल त्या गतीने स्वीकारेलच असे नाही. महिलांबाबत बोलायचे तर त्यांच्या विकासाचा वेग अधिक आहे. त्या देखील आधुनिक आणि शास्त्रीय बदल स्वीकारून पुढे जाताना दिसत आहेत. महाराष्ट्राचाच विचार केला तर मुंबई ते गडचिरोली अशा विविध परिस्थितीत आणि सामाजिक-आर्थिक स्तरात राहणाऱ्या शिक्षित, अशिक्षित, दुर्बल व आधुनिक घटकातील महिलांचा त्यामध्ये समावेश आहे. त्यांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. हे प्रश्न फक्त सुरक्षिततेशी संबंधित आहेत असे नाही. या प्रश्नांना सामाजिक, आर्थिक, राजकीय असे वेगवेगळे पैलू आहेत. त्यामुळे महिला समस्या या फक्त त्यांच्यापुरत्या मर्यादित नसून, संपूर्ण कुटूंब व समाजाशी निगडित आहेत. अशा परिस्थितीमध्ये फक्त महिलांचे प्रबोधन करुन चालणार नाही, तर समाजाचेही त्या दृष्टीने विचार परिवर्तन करावे लागेल. त्यांना विकासाच्या दिशेने पावले टाकायची हे पटले आहे. तसे नसते तर तत्काळ तलाकसारख्या प्रश्नांना महिलांनी एवढे उचलून धरले नसते. त्यांना हव्या असणाऱ्या बदलासाठी समाजाची साथ त्यांना मिळावी म्हणून समाजाचे प्रबोधन करण्याची गरज आहे. हे काम येत्या काळात राज्य महिला आयोगाकडून अपेक्षित आहे. गेल्या दोन वर्षांत महिला आयोगाचा महिला समस्यांची हाताळणी करण्यामध्ये वाढता सहभाग नक्कीच समाधानकारक आहे.

## आयोगाकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?

राज्य महिला आयोगाचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. या वर्षात आयोगाचा महिला सक्षमीकरणाच्या कार्यात अधिक प्रभावी सहभाग असेल अशी अपेक्षा आहे. ह्युमन ट्रॅफिकिंग या विषयावर घेतलेली परिषद, महिला आयोगाकडे असलेल्या प्रश्नांची विभागवार सुनावणी किंवा दामिनी पथकांची स्थापना असे उपक्रम महत्त्वाचे आहेत. दोन वर्षांत आयोगाने केलेल्या विविध कामांचा हा परिणाम आहे. पूर्वी महिला आयोगाचे अस्तित्व अपवादानेच जाणवायचे, आता हा आयोग कार्य करताना दिसतो आहे, हा चांगला बदल आहे. महिलांच्या समस्यांची सोडवणूक एवढ्यावरच मर्यादित न राहता आयोगाने महिलांच्या एकूणच सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी काय करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत, असे मला वाटते.

## मध्यंतरी राज्य सरकारने महिला उद्योजकांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर केले होते. त्या पद्धतीचे महिलाविषयक समग्र धोरण राज्य शासन तयार करणार आहे का?

या माध्यमातून अतिशय महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधतो. खूप महत्त्वाचे काम सुरू झाले आहे. शाश्वत आर्थिक व सामाजिक विकासात महिला उद्योजकांची महत्त्वाची भूमिका आहे. मात्र, महिलांना उद्योग-व्यवसायाची उभारणी करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव, मर्यादित आर्थिक स्रोत व गुंतवणूक साह्य, परवडण्यायोग्य व सुरक्षित जागांचा अभाव इत्यादींचा समावेश आहे. राज्याचा सर्वसमावेशक विकास करताना महिला संचलित उपक्रमांच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक बदल घडविण्यासाठी प्रोत्साहन




> ॲसिड हल्ला पीडित महिलांना समाजात आत्मविश्वासाने वावरता यावे, नवे आयुष्य सुरू करत समाजात स्थान मिळावे या उद्देशाने 'कॉन्फिडन्स वॉक' गेल्यावर्षी घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने उचलेल  हे पाऊल कौतुकास्पद आहे. आयोगाने गेल्या दोन वर्षात राज्यभरातील महिलांना त्यांच्या जिल्ह्यातच न्याय मिळावा यासाठी हाती घेतलेल्या 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमामुळे ही महिला पुढे येऊन आपल्या तक्रारी मांडत आहेत, महिला आयोग आपल्या दारी उपक्रमात तक्रार घेऊन येणाऱ्या महिलांची संख्या पाहता आयोगाबद्दल विश्वास निर्माण झाल्याची खात्री वाटते.महिलांना त्यांच्या जिल्ह्यात त्याच दिवशी न्याय मिळत असल्याने पोलिसांवरील ताण कमी होण्यास मदत होते आहे.
>
> **– देवेंद्र फडणवीस,** मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र

देणे गरजेचे होते. तसेच औद्योगिक विकासासाठी राज्यात तयार करण्यात आलेल्या पोषक वातावरणाचा लाभ महिला उद्योजकांना मिळावा आणि त्यातून महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन मिळावे यासाठी विशेष धोरण राबविण्याचा निर्णय राज्याकडून घेण्यात आला आहे.

### मेक इन महाराष्ट्र ते स्टार्ट अपपर्यंतचा सक्षमीकरणाचा प्रवास कसा आहे?

राज्याने लागू केलेल्या अशा प्रकारच्या धोरणाची देशात प्रथमच अंमलबजावणी होत असून या माध्यमातून राज्याने महिलांना नावीन्यपूर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे. या धोरणामुळे राज्यातील महिला संचलित उद्योगांचे प्रमाण ९ वरून २० टक्क्यांपर्यंत वाढविणे शक्य होणार आहे. तसेच आगामी पाच वर्षांत १५ ते २० हजार महिला उद्योजकांमार्फत दोन हजार कोटी रुपये गुंतवणूक व एक लाख रोजगार उपलब्ध होणार आहे. महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण यशस्वीपणे राबविण्यासाठी चालू आर्थिक वर्षात १५ कोटी २१ लाख आणि पुढील पाच वर्षांसाठी अंदाजे एकूण ६४८ कोटी ११ लाख रुपयांची तरतूद करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ एकल मालकी, भागीदारी, सहकारी क्षेत्र, खासगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक आणि स्वयंसहाय्यता बचतगट यांना मिळणार आहे. या घटकांमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये किमान ५० टक्के महिला कामगार असणे आवश्यक आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर महिला उद्योजकांसाठी इन्क्युबेटर स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. इन्क्युबेटर स्थापन करण्यासाठी जमीन वगळून प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के रक्कम ही कमाल पाच कोटी रुपयांच्या मर्यादेत उपलब्ध करून देण्यात



येईल. महाराष्ट्रात कमाल तीन ठिकाणी असे इन्क्युबेटर स्थापन करण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. महिला उद्योजकांच्या दृष्टीने मैत्रीपूर्ण व पूरक-पोषक वातावरण तयार होइल यात शंका नाही.

औद्योगिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या मेक इन महाराष्ट्रमध्ये महिलांमधील उद्यमशीलतेला प्रोत्साहन देण्यात येत असून, याबाबतच्या प्रोत्साहन योजनेत महिला उद्योजकांचा समावेश करण्यात आला आहे. स्टार्ट अप उद्योगांमध्येही महिलांना उत्तम संधी आहेत. रात्रपाळीत काम करणाऱ्या महिला कामगारांना अधिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून, तीन महिन्यांत अतिकालिक कामाच्या ७५ इतक्या दिवसांच्या आधीच्या मर्यादेऐवजी त्यांना आता ११५ दिवस अतिकालिक काम करणे शक्य झाले आहे.

## सुरक्षेच्या दृष्टीने नेमके बदल कोणते होत आहेत?

अत्यंत कुशल व परिणामकारक बदल होत आहेत. मुळात दूरगामी परिणाम यामुळे दिसून येतील. महिलांची सुरक्षा हा अग्रक्रमाचा विषय आहे. महिलांच्या मदतीसाठी सर्व पोलीस ठाण्यांत महिला पोलिसांची उपलब्धता करतानाच पोलीस ठाण्यांच्या पातळीवर महिला सुरक्षा समिती, जिल्हा पातळीवर महिला साह्य कक्ष आणि राज्य पातळीवर महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाची स्थापना करण्यात येत आहे. तसेच जिल्हा पातळीवर हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात वाहन, वायरलेस वॉकीटॉकीसह महिला पोलीस बीट मार्शल तसेच दामिनी बीट मार्शल तयार करण्यात आले आहे. महिलांच्या सुरक्षेविषयी प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाळा,कॉलेज, आयटी कंपन्यांमध्ये मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. महिलांना स्वरक्षणासाठी शाळा व कॉलेजमध्ये कराटे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच पोलिस मुख्यालय येथे महिला पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना कराटे व स्वरक्षण प्रशिक्षण दिले जाते. रेल्वे स्थानक, बस स्थानक, सिनेमा हॉल, सार्वजनिक बागा, शैक्षणिक संस्था, प्रमुख धार्मिक स्थळे अशा गर्दीच्या ठिकाणी संबंधित पोलीस ठाण्यातर्फे साध्या वेशातील महिला पोलिसांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याबरोबरच गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी प्रतिसाद मोबाईल ॲपची निर्मिती करण्यात आली असून महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच पीडित महिलांच्या सहाय्यासाठी १११ समुपदेशन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी २७ विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात आली असून, २२ जलदगती न्यायालयांस मान्यता देण्यात आली आहे. महिलांच्या जागरूकतेसाठी शिबिरांचे आयोजन करण्यासह बचतगटातील महिलांना कायदेविषयक माहिती देण्यात येते. लिव्ह इन रिलेशनशिप संबंधात होणारी महिलांची फसवणूक टाळण्यासाठी प्रतिष्ठित व्यक्ती, धर्मगुरू, सामाजिक जाणिवेचे नेते यांच्यामार्फत समाजप्रबोधन करण्यात येते.

**मुलाखत शब्दांकन : कीर्ती पांडे,**
जनसंपर्क अधिकारी, मा. मुख्यमंत्री

# समान पोषण, समान शिक्षण



बेटी बचाओ - बेटी पढाओ
Beti Bachao-Beti Padhao

**राज्याच्या महिला आणि बालकल्याण विभागाच्या वतीने स्त्रिया आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. मुलगा - मुलगी असा भेदभाव न करता मुलींनाही समान पोषण आणि समान शिक्षण देणे गरजेचे आहे. समाजातील सर्व घटकांनी यासाठी पुढाकार घ्यावा.**




**पंकजा मुंडे**
मा. महिला आणि बालकल्याण मंत्री


राज्य शासनाच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. माझी कन्या भाग्यश्री योजनेतून मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देण्याबरोबरच तिचे पोषण, शिक्षण आणि आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने कार्यक्रम राबविण्यात येत आहे. उमेद अभियान, माविम यांच्यामार्फत महिलेचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे यासाठी राज्यात बचतगटांची चळवळ उभी करण्यात आली आहे. याशिवाय विविध योजना, अभियान, कार्यक्रम यांच्या माध्यमातून महिलेचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सक्षमीकरण व्हावे यासाठी राज्य शासन व्यापक प्रयत्न करीत आहे.

उमेद अभियान (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) आणि महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला सक्षमीकरणाचे काम सुरू आहे. बचतगटांना विविध उद्योग - व्यवसायासाठी बँकेमार्फत पतपुरवठा केला जातो. शासनाने बचतगटांना बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करून देण्याची सुमतीबाई सुकळीकर महिला उद्योगिनी सक्षमीकरण



योजना ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. राज्यातील अडीच लाख बचतगट या योजनेचे लाभार्थी असून, एकूण २५ लाख कुटुंबे या योजनेचा लाभ घेत आहेत. सन २०१६-१७ साठी राज्य शासनाने व्याज अनुदानासाठी १० कोटी रुपये तरतूद उपलब्ध करून दिली होती. राज्यात सन २०१९पर्यंत ५ लाख बचतगटांना म्हणजेच साधारण ५० लाख कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची योजना असून, ती प्रभावीपणे राबविली जाईल.

मुलगी नको ही समाजधारणा आता बदलण्याची वेळ आली आहे. मुलगीही सक्षमपणे कुटुंबाचा वारस होऊ शकते, म्हणून 'मुलगीच माझा वारसदार' या संकल्पनेला शासन मूर्त स्वरूप देणार आहे. त्यामुळे समाजातील स्त्री-पुरुष जन्म दराचे व्यस्त प्रमाण निश्चितच संतुलित होईल, असा मला विश्वास वाटतो. शासन त्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलत आहे.

मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींचे शिक्षण, आरोग्य यामध्ये सुधारणा करणे, त्यांच्या उज्ज्वल भविष्याकरिता आर्थिक तरतूद करणे, बालिका भ्रूणहत्या रोखणे, मुलींच्या जन्माबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार आणणे, बालविवाह रोखणे याकरिता महिला आणि बालविकास विभागामार्फत 'माझी कन्या भाग्यश्री योजना' सुरू करण्यात आली आहे. वार्षिक उत्पन्न ५ लाख रुपयांपर्यंत असणाऱ्या घटकांसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. एका मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास या योजनेतून मुलीच्या नावे ५० हजार रुपये मुदत ठेवीद्वारे बँकेत गुंतविले जातात. मुलीच्या वयाच्या सहाव्या व बाराव्या वर्षी तिचे शिक्षण आणि पोषणासाठी व्याजाची रक्कम काढून घेण्यास व अठराव्या वर्षी मुलीच्या उच्च शिक्षणासाठी व्याजाची रक्कम मूळ गुंतवणूक रक्कमेसह काढून घेण्यास मान्यता देण्यात




आली आहे. दोन मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास प्रत्येकी २५ हजार रुपये इतकी रक्कम मुलीच्या नावे बँकेत गुंतवणूक केली जाते. मुलगी ही कुटुंबाचा वारस म्हणून पुढे आली पाहिजे असा आमचा प्रयत्न आहे. यासाठी समाजातील अनेक गैरसमज दूर करणे गरजेचे आहेत. माझी कन्या भाग्यश्री आणि बेटी बचाओ, बेटी पढाओ हे अभियान राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येईल.

अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे मानधन पूर्वी प्रकल्प व जिल्हास्तरावर देण्यात येत असल्यामुळे मानधन मिळण्यास दोन-तीन महिन्यांचा विलंब होत होता. तो विलंब दूर करण्यासाठी मानधन थेट त्यांच्या बँकखात्यात जमा करण्यासाठी राज्यस्तरावर पीएफएमएस सन्मान प्रणाली सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे सेविकांचे मानधन वेळेत दिले जात आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन वाढविण्यात आले आहे. राज्यातील सुमारे २ लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळत आहे.



अत्याचारग्रस्त महिलांचे पुनर्वसन करणे, त्यांना आधार देणे यासाठीही शासन काम करीत आहे. बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि सिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसाह्य करणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना सुरू करण्यात आली आहे. अशा महिला व बालकांना शारीरिक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे, वित्तीय सहाय्य देणे तसेच समुपदेशन, निवारा, वैद्यकीय व कायदेशीर मदत करण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पीडितांना पुनर्वसनासाठी जुन्या निकषानुसार २ ते ३ लाख रुपयांपर्यंत अर्थसाह्य व पीडितांचे पुनर्वसन करण्यात येत होते. तथापि, नवीन निकषानुसार गंभीर व तीव्र स्वरूपाच्या प्रकरणामध्ये पीडितास १० लाख रुपयांपर्यंत अर्थसाह्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासन सर्व स्तरावर व्यापक प्रयत्न करीत आहे. यात समाजाची भूमिका फार महत्त्वाची असणार आहे. मुलगी जन्मलीच नाही तर सगळेच कोलमडून पडेल, त्यामुळे मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्याबरोबरच मुलगा - मुलगी असा भेदभाव न करता मुलींनाही समान पोषण आणि समान शिक्षण देणे गरजेचे आहे. समाजातील सर्व घटकांनी यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मी या निमित्ताने करते.

**(शब्दांकन : इर्शाद बागवान,**
**विभागीय संपर्क अधिकारी)**



# कुपोषणमुक्ती हाच ध्यास

## विद्या ठाकूर
मा. राज्यमंत्री, महिला आणि बालकल्याण विभाग

***सर्व प्रथम महाराष्ट्राच्या सर्व जनतेला नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !***


राज्य महिला आयोगाचेही रौप्य महोत्सवानिमित्त अभिनंदन. राज्य महिला आयोग हे नेहमीच महिलांच्या मदतीसाठी, सुरक्षिततेसाठी सक्रिय आहे.

रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने आयोगामार्फत ‘साद’ हे मासिक सुरू होत आहे. या निमित्ताने राज्य महिला आयोगाचे अभिनंदन. हे मासिक महिलांना अधिकाधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करेल, अशी आशा आहे.

महिलांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरण वेगाने होत असल्याचे आज दिसून येत आहे. महिलांना समान संधी आणि त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत.

देशाला विकसित करावयाचे असेल तर मातृशक्ती सक्षम करण्याची गरज आहे, असे मला वाटते. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, यासाठी शासनामार्फत व्यापक धोरणे

**महिलांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरण वेगाने होत असल्याचे आज दिसून येत आहे. महिलांना समान संधी आणि त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत.**





राबविली जात आहेत. राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या मनोधैर्य योजनेच्या नावातच त्याचा उद्देश सामावला आहे. शासनाची ही एक अत्यंत चांगली योजना आहे. बलात्कारपीडित, सिड हल्ल्यात जखमी झालेल्या, अन्यायग्रस्त महिलांचे मनोधैर्य वाढवून त्यांना पुन्हा नव्याने उभारी देण्याची गरज असते. मनोधैर्य योजनेतून त्यासाठी प्रयत्न केले जातात. घडलेली घटना हा अपघात आहे. इतर अपघातांतून सावरून आपण जीवन पुन्हा नव्याने सुरू करतो. तशाच पद्धतीने बलात्कारपीडित, अन्यायग्रस्त महिलांनीही न खचता आपले जीवन नव्याने सुरू केले पाहिजे. यामध्ये कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, असे मला वाटते.

शेतीत काम करणाऱ्या महिला ह्या खऱ्या अर्थाने 'करिअर वुमन' आहेत, असे मला वाटते. घर, मुलेबाळे सांभाळून त्या दिवसभर शेतात राबतात. देशाच्या कृषी प्रगतीत त्यांच्या कष्टाचा अत्यंत मोलाचा वाटा आहे. कुटुंब आणि करिअर या दोन्ही बाबी एकाच वेळी सांभाळण्याची शक्ती स्त्रियांमध्ये आहे. ग्रामीण असो किंवा शहरी असो, दोन्ही भागातील महिला आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर या कसरतीत यशस्वी होतात. त्यामुळे महिलांच्या कार्यशक्तीचा आपल्याला नेहमीच अभिमान वाटतो.

महिला बचत गटांना वर्षभर वस्तू विकण्यासाठी जिल्हास्तरावर मॉल उभारण्याच्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. त्यामुळे वैविध्यपूर्ण व दर्जेदार साहित्य निर्माण होईल. राज्यातील महिला बचत गटांना बिनव्याजी कर्ज देण्यासाठी राज्य शासन पुढाकार घेत आहे. कर्जाच्या व्याजाची रक्कम राज्य शासन भरणार आहे. महिला बचत गट घेत असलेल्या कर्जाची १०० टक्के परतफेड करतात. त्यांचा प्रामाणिकपणा व स्वाभिमान इतर कर्ज परत न करणाऱ्या उद्योगपतींच्या तुलनेत कितीतरी मोठा आहे. म्हणूनच देश व राज्याच्या प्रगतीत महिलांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे.

कुपोषणाचे निर्मूलन हे महिला आणि बालविकास विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे कार्य करीत आहेत. कुपोषणाचे निर्मूलन, लसीकरण, गरोदर माता

तसेच स्तनदा मातांचे संगोपन, बालकांचे पोषण अशा विविध पातळ्यांवर महिला कर्मचारी आपले योगदान देत आहेत. महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहू नये, यासाठी या विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. आज राज्यातील सर्व बालगृहांचे थर्ड पार्टी ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार एक हजारांहून अधिक बालगृहांचे ऑडिट अंतिम टप्प्यात आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम हाती घेण्यासाठी खाजगी कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

महिला विकास व बालविकास एकत्र केल्यानंतर राज्याचा सर्वांगीण विकास सहज शक्य आहे. तो कोणीही रोखू शकत नाही. समाजात स्त्री म्हणून काम करीत असताना तिने स्त्रीत्व जपून आत्मशक्ती वाढविली पाहिजे. त्यामुळे स्त्रीशक्तीला जास्तीतजास्त प्राधान्य देण्याची गरज आहे. ते काम स्वयंसाहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून राज्य शासन महिलांच्या भक्कमपणे पाठीशी उभे आहे.

मला येथे आर्वजून सांगावेसे वाटते की, सध्या राज्यभरात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये मा. मंत्री अथवा मा. राज्यमंत्री या महिला लोकशाही दिनी त्यांच्यापुढे आलेल्या तक्रारींचे/समस्यांचे निवारण करीत असतात.

## शासनाच्या साथीने महिला सक्षमीकरण

महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने त्यांना मदत करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या जोमाने विकासकामांत सहभागी व्हाव्यात यासाठी शासन अनेक योजना राबवित आहे. महिला बचत गट, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना आदी विविध योजना वेगवेगळ्या विभागामार्फत राबविल्या जातात. या शिवाय सर्वसमावेश असे महिला धोरणही राबविण्यात येत आहे. बचतगटांसाठी सुमतीबाई सुकळीकर उदयोगिनी महिला सक्षम ीकरण योजनेतून महिला बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. मुलींचा जन्मदर वाढविणे व स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी राज्यात १ एप्रिल २०१६ पासून माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू करण्यात आली आहे.

## कुपोषणमुक्तीवर भर

महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही यासाठी या विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजनेमार्फत राज्यात कुपोषणमुक्तीसाठी विशेष कार्यक्रम राबविला जात आहे.

## निराधार आणि पीडित महिलांना आधार

बलात्कार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य करणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यात मनोधैर्य योजना सुरू करण्यात आली आहे आहे. यामध्ये पीडित महिलेला देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ करण्यात आली आहे.

सक्षम महिला आणि सुदृढ बालक घडविणे याचसाठी महिला व बालविकास विभाग काम करीत आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम हाती घेण्यासाठी खासगी कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**
**विभागीय संपर्क अधिकारी**



# आता उजाडेल...



**लोकसभेत तिहेरी तलाकच्या विरोधात विधेयक मंजूर होणे, ही खूप मोठी गोष्ट आहे. १९८४मधील शाहबानो ते २०१७मधील शायराबानो असे एक वर्तुळ पूर्ण होत आहे. फेब्रुवारी १९८६ मध्ये मुस्लिम माता-भगिनींचा न्यायालयात जाण्याचा अधिकार हिरावून घेतला. मात्र, आता तिहेरी तलाकविरोधी विधेयकामुळे या महिलांना न्याय मिळेल.**




## विजया रहाटकर,

अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग


ज्याची अनेक दशके वाट पाहिली जात होती, तो दिवस अखेर आला... कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांनी लोकसभेत तीन तलाकच्या कुप्रथेविरोधात विधेयक सादर केले आणि ते चर्चेअंती संमतही झाले. म्हणूनच २८ डिसेंबर हा दिवस मुस्लिम महिलांच्या अधिकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण राहील, कारण याच दिवशी' मुस्लिम महिला विवाह अधिकारांचे संरक्षण विधेयक, २०१७' नावाचा कायदा बनण्याच्या दिशेने पहिले पाऊल पडले आहे. हे विधेयक मंजूर होताच पुरुषांनी एकाच दमात तीन तलाक म्हणून घटस्फोट देणे, हा गुन्हा ठरेल आणि त्यासाठी तीन वर्षांच्या शिक्षेची तरतूद असेल.

तिहेरी तलाकच्या प्रथेवर गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा होत आहे. या सर्व चर्चांचे सार हेच आहे, की ही एक अमानवीय आणि बुरसटलेली परंपरा आहे. ही मनमानी असून ती जाणार हे निश्चित आहे. कोणत्याही सभ्य आणि समतापूर्ण समाजासाठी ही प्रथा एक डाग आहे. म्हणूनच खुद्द सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत स्पष्ट शब्दांत म्हटले आहे, की मुस्लिमांमधील एकदाच

तलाक म्हणून देण्यात येणारा घटस्फोट ‘अमान्य, ‘अवैध’ आणि ‘घटनाबाह्य’ आहे.

मुस्लिम कशाला, कोणतेही विवाहसंबंध संपुष्टात आणण्यासाठी तिहेरी तलाक पद्धत कधीही स्वीकारार्ह होऊ शकत नाही. तीन तलाकशी संबंधित विधेयक हे मुस्लिम महिलांना बरोबरीचा अधिकार देण्यासाठी स्वातंत्र्यानंतरचा कदाचित सर्वांत मोठा उपक्रम आहे. एका झटक्यात तीनदा तलाक - मग तो बोलून दिलेला असो, ई मेलवरून असो किंवा एसएमएस-व्हॉट्स अपवरून असो- आता इतिहासजमा होईल. या विधेयकानुसार जो पती आपल्या पत्नीला मौखिक, लेखी किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने एकत्र तीन तलाक (तलाक-ए-बिद्दत) देईल त्याला तीन वर्षांची शिक्षा व दंडही होईल.

मुस्लिम महिलांसाठी हे स्वाभिमान आणि समानतेचे नवे युग सुरू करणारी घटना आहे. तसेच हे पाऊल ’कोणाचाही अनुनय नाही आणि सर्वांसाठी न्याय’ या तत्त्वाचा अंगीकार करणारे आहे. या कुप्रथेचा चिकाटीने विरोध करणाऱ्या भारतीय मुस्लिम महिला आंदोलन (बीएमएमए) यांच्यासह अनेक संस्थांचे मनःपूर्वक अभिनंदन करावे लागेल. भारताच्या घटनात्मक इतिहासात केंद्र सरकारने प्रथमच सात ऑक्टोबर २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयात तीन तलाक, निकाह हलाल आणि बहुविवाह प्रथेचा विरोध केला होता, हे मला आवर्जून सांगायचे आहे.

एकीकडे हे विधेयक संसदेत येत असताना उत्तर प्रदेशातील रामपूर येथील एका भगिनीला या अत्याचाराचा सामना करावा लागला, ही एक विसंगतीच म्हणावी लागेल. तिचा गुन्हा एवढाच होता, की ती सकाळी झोपेतून उशिरा उठली आणि पतीने तिला तलाक दिला. सर्वोच्च न्यायालयाने तलाकवर बंदीचा ऐतिहासिक निर्णय देऊनही इतकी हिंमत दाखविली गेली, पण गुल अफशां हिच्यासारख्या सुमारे शंभर प्रकरणांमध्ये तलाक दिला गेला, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही. म्हणूनच लोकसभेत तिहेरी तलाकच्या विरोधात विधेयक मंजूर होणे, ही खूप मोठी गोष्ट आहे. शाहबानो ते शायराबानोचे एक वर्तुळ पूर्ण होत आहे. शाहबानो खटला आपणा सर्वांना तर माहीत असेलच. त्या बिचाऱ्या घटस्फोटीत महिलेला सर्वोच्च न्यायालयाने केवळ १२७ रुपयांची मेहेर व पोटगी देण्याचा आदेश दिला होता. मात्र, १९८६ मध्ये एका कायद्याद्वारे मुस्लिम महिलांचा पोटगीचा अधिकार हिरावला गेला. आता मात्र तिहेरी तलाकच्या विरोधात शायरा बानोने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली तेव्हा विद्यमान सरकारने तिला पाठिंबा दिला. अन् आता तिहेरी तलाकची कुप्रथा समाप्त होण्याच्या मार्गावर आहे. एवढा मोठा प्रवास आपल्या मुस्लिम भगिनींनी केला आहे.




ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने या विधेयकाची संभावना महिलाविरोधी म्हणून केली आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या दृष्टीने हे विधेयक घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. मला त्यांना विचारायचे आहे, की पीडित महिलांना काही मूलभूत अधिकार आहेत की नाही? त्या शेळ्या-मेंढ्या आहेत का? देशातील कोट्यवधी मुस्लिम महिलांना समानता आणि स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार नाही का?

हा कायदा महिलांच्या आत्मसन्म ानाचा आहे. सुप्रीम कोर्टाने तलाक-ए-



बिद्दतला बेकायदा ठरविल्यानंतरही अशा तलाकची शंभरहून अधिक प्रकरणे समोर आली आहेत. या लोकांना गुन्हेगार नाही, तर काय म्हणावे? गरीब मुस्लिम महिलांच्या बाजूने उभे राहणे हा अपराध असेल, तर आम्ही तो शंभरदा करू. महिलांवर अन्याय होत राहील, तर या सभागृहाने काय शांत बसावे? धर्माच्या नावावर आपल्या अर्ध्या लोकसंख्येशी जनावरांसारखा व्यवहार होत असेल, तर जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून आपण कोणत्या तोंडाने बोलणार?



काही व्यक्ती, संस्था या विधेयकावर टीका करत आहेत. ते म्हणतात, की तीन तलाकला गुन्हा ठरविण्याने आणि त्यासाठी तीन वर्षांच्या शिक्षेची तरतूद केल्याने त्यांचा गैरवापर होईल. त्यांचे हेही म्हणणे आहे की, पती तुरुंगात गेला तर या पीडित महिलांना पोटगी कोण देणार? या इतक्या बाष्कळ गोष्टी आहेत की, त्यावर हसू येते. त्या मान्य केल्यास बलात्कार, खून, महिलांवरील गुन्ह्यांमध्ल दोषी व्यक्तींना कधीही तुरुंगामध्ये पाठवता कामा नये. कारण ते तुरुंगात गेले तर त्यांच्या कुटुंबाचा निर्वाह कसा होईल? हा काय बालिशपणा आहे? गैरवापर होण्याची शंका आपण समजू शकतो, पण अशा शंका सर्वच कायद्यांबाबत असतात. कधी-कधी बलात्काराच्या बाबतीत गैरवापर होतो, म्हणून काय आपण बलात्काराच्या विरोधातील कठोर तरतुदी काढणार का? त्याचप्रमाणे भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ अ (हुंडाविरोधी कायदा) याचाही सर्वाधिक गैरवापर होतो. स्वत: सर्वोच्च न्यायालयानेही हे मान्य केले आहे. म्हणून काय ते कलम आपण काढून टाकायचे? गैरवापराची शक्यता असेल, तर सर्वांनी मिळून त्यातून मार्ग काढायला हवा; परंतु तिहेरी तलाकच्या गुन्हेगारांना त्यांच्या गुन्ह्यांची शिक्षा मिळायलाच हवी. अशा प्रकारचा धाक, जरब समाजस्वास्थासाठी अत्यंत आवश्यक आहे. शिवाय कोणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा भंग करत असेल, तर ते गुन्हेगारी कृत्यच (क्रिमिनल केस) मानले जाते.

राहिली गोष्ट शरियतमध्ये हस्तक्षेप करण्याची. ही पूर्णपणे खोटी गोष्ट आहे. कारण हे विधेयक धर्माबाबत नाहीच. त्याकडे राजकीय नजरेने पाहून चालणार नाही. हे विधेयक धर्माचे नव्हे, तर महिलांच्या स्वाभिमानाचे आहे. खुद्द सर्वोच्च न्यायालयाचे न्या. कुरियन जोसेफ यांनी आपल्या निकालपत्रात लिहिले आहे, की या कुप्रथेला कुराणात पाप म्हटले असेल, तर कायद्यातही ते पापच असले पाहिजे. या विधेयकावर 'इस्लामविरोधी' शिक्का मारण्याची काही जणांची घाई चुकीची आहे.

आता प्रतीक्षा आहे ती लवकरात लवकर हे विधेयक मंजूर होऊन त्याचा कायदा होण्याची, जेणेकरून आमच्या मुस्लिम भगिनी अन्य समुदायांच्या खांद्याला खांदा लावून देशाच्या निर्माणात आपले योगदान देतील. हा नऊ कोटी मुस्लिम महिलांच्या घुसमटीचा आणि आकांक्षेचा प्रश्न आहे. अगोदरच ५० वर्षांचा उशीर झालाय. आता एक क्षणही उशीर होता कामा नये...

# ऐतिहासिक पाऊल

**भारतीय मुस्लिम महिला आंदोलनाने २००८ पासून देशभर या विषयावर चर्चा घडवून मुस्लिम कौटुंबिक कायद्याचा व्यापक मसुदा तयार केला आहे. या मसुद्याला अनुसरून सध्याच्या विधेयकात दुरुस्त्या केल्यास ते एनडीए सरकारने मुस्लिम महिलांसाठी केलेले खूप मोठे काम ठरेल.**



**डॉ. नूरजहाँ सय्यद**
सहसंस्थापिका, भारतीय मुस्लिम महिला आंदोलन

मुस्लिम महिला (वैवाहिक हक्क संरक्षण) विधेयक २०१७ हे लोकसभेत मंजूर झाले, मात्र राज्यसभेत अद्याप त्याला मंजुरी मिळालेली नाही. लैंगिक विषमतेविरोधातील या लढाईत मुस्लिम महिलांना अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. मात्र, या टप्प्यावर आतापर्यंतच्या कामगिरीचा आढावा घेणे अवाजवी ठरणार नाही.

स्वतंत्र भारताच्या इतिहासात कायदा आणि धार्मिक क्षेत्रातील कोणीही सुप्रसिद्ध नेता नसतानाही प्रथमच मुस्लिम महिलांनी सुधारणांसाठी संघटित लढा दिला. तिहेरी तलाकच्या बळी ठरलेल्या आणि तळागाळातील सामान्य मुस्लिम महिलांनी उभारलेला हा लढा होता.

मुस्लिम महिलांना तोंड द्यावे लागत असलेल्या भेदभावाविरोधात या महिलांनी मोकळेपणाने बोलावे आणि आवाज उठवावा, यासाठी गेल्या दहा वर्षांपासून भारतीय मुस्लिम महिला आंदोलन (बीएमएमए) करीत असलेल्या अथक प्रयत्नांचे हे यश आहे. तिहेरी तलाकविरोधात समाजात व्यापक आणि मोठ्या प्रमाणावर चर्चा घडविण्यात आली. आजवर शरियाविषयक कोणत्याही विषयावर बोलण्याची इच्छा समाजात

दिसत नसे. हे विषय सर्वस्वी धर्मगुरूंवर सोडून दिले जात. मात्र, गेल्या पाच-सहा वर्षांत मुस्लिम समाजात या विषयावर धीटपणे चर्चा झाली.

तिहेरी तलाक, हलाला आणि बहुपत्नीकत्व यांच्याविरोधात प्रथमच पाच पीडित महिला आणि बीएमएम एसारखी व्यापक जनाधार असलेली संघटना न्यायासाठी सर्वोच्च न्यायालयात गेली. मुस्लिम महिला आता बदलासाठी तयार झाल्या आहेत. त्यांना त्यांच्या धार्मिक आणि घटनात्म क अधिकारांची पूर्ण जाणीव झाली आहे आणि देशाच्या सर्वो च्च संस्थेपर्यंत दाद मागण्याइतपत आत्मविश्वास त्यांच्यात जागृत झाला आहे, याचे ते निदर्शक आहे.

पितृसत्ताक पुरुषी व्यवस्थेचे समर्थक असलेले धर्मगुरू आणि धार्मिक संघटनांना संपूर्ण समाजानेच आव्हान दिले, हा देखील खूप मोठा बदल होता.

धर्मगुरूंचे वर्चस्व हा आता कालबाह्य झालेली बाब ठरली आहे, हेही या निमित्ताने दिसून आले. या धर्मगुरूंच्या पुरुषप्रधान आणि इस्लामविरोधी दृष्टिकोनाचा बुरखा फाटला. आता ते धर्माच्या नावाखाली संपूर्ण समाजाला वेठीला धरू शकणार नाहीत.

मुस्लिम महिला हक्क विधेयक लोकसभेत सादर करून सध्याच्या सरकारने राजकीयदृष्ट्या धाडसी पाऊल उचलले. तिहेरी तलाकला विरोध  हा पर्सनल लॉमध्ये हस्तक्षेप असल्याचे सांगत सरधोपट विरोध करण्याचे टाळून जवळपास एकमताने हे विधेयक मंजूर करून विरोधी पक्षांनीही सकारात्म क भूमिका घेतली.

मुस्लिम महिलांच्या मागण्यांवर लोकसभा आणि राज्यसभेत अत्यंत अटीतटीची चर्चा होणे हाच मोठा राजकीय बदल आहे. या चर्चांतून ठोस निर्णय झाला नसला तरीही धार्मिक आणि घटनात्मक अधिकारांसाठी झगडणाऱ्या मुस्लिम महिलांच्या दृष्टीने ते महत्त्वाचे होते.

काही धर्मनिरपेक्ष आणि स्त्रीवादी गटांनी या विधेयकाच्या विरोधात भूमिका घेतली. कोणतीही सुधारणा न सुचवता त्यांनी या विधेयकाला विरोधासाठी विरोध करणे यातूनच त्यांना मुस्लिम महिलांचे संघटन मान्य नसल्याचेच दिसून येते. हे विधयेक निष्पक्ष होण्यासाठी आणि केवळ दंडात्मक स्वरूपाचे होऊ न देण्यासाठी त्यांनी मुस्लिम महिलांच्या पाठीशी उभे राहून आवश्यक त्या सुधारणा विधेयकात करण्याचा आग्रह धरायला हवा होता.

या विधेयकातील कारवाईची तरतूद रद्द करण्याम ागील त्यांचा आग्रह तलाकपीडितांच्या भूमिकेशी अत्यंत विसंगत होता. तिहेरी तलाक देणाऱ्यांना शिक्षा व्हावी. मात्र, कायद्यातील इतर तरतुदींसारखा हा गुन्हा जामीनपात्र आणि अदखलपात्र असावा, अशी तलाकपीडित महिलांची मागणी आहे. मुस्लिम महिलांच्या समर्थनार्थ अशी अभिनव भूमिका न



घेणे म्हणजे टीकाकार मुस्लिम महिलांच्या सद्यस्थितीविषयी अनभिज्ञ असल्याचे अधोरेखित करते.

केंद्रातील सत्ताधारी एनडीए सरकारने सादर केलेले विधेयक धाडसी पण अपूर्ण आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते. २०१४पासून बीएमएमएने प्रस्तावित विधेयकाचा मसुदा सर्व व्यासपीठांवर आणि पंतप्रधान कार्यालयासह सर्व सरकारी कार्यालयामध्ये सादर केला आहे. कुराण आणि राज्यघटना यांतील तरतुदीवर आधारित व्यापक कायदा करावा, अशी आमची मागणी आहे.

आमच्या मसुद्यात घटस्फोटाची अपेक्षित प्रक्रिया तपशीलवार देण्यात आली असून, तिला कायदेशीर रूप द्यावे. हलाला, मुटा आणि बहुपत्नीकत्व या तिन्ही बाबींवर बंदी असावी, अशी आमची स्पष्ट मागणी आहे. विवाहाचे वय, मुलांचा ताबा, पोटगी, मालमत्तेतील वाटा आदी बाबी कायद्याद्वारे निर्धारित करण्याचेही आम्ही सुचविले आहे.

या विधेयकाचा मसुदा आम्ही ६२ महिला खासदार आणि राष्ट्रीय विधी आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोगाकडे पाठविला आहे. हा मसुदा मंजूर झाल्यास महिलांना न्याय मिळू शकला असता. मात्र, सध्याच्या विधेयकात आमच्या सूचनांचा व मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

आता प्रस्तावित विधेयकावर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारने मुस्लिम महिलांना चर्चेसाठी बोलवावे. हे विधेयक अधिक सर्वस्पर्शी करण्यासाठी आमच्या काही सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१)तलाक एहसान पद्धतीचा समावेश विधेयकात करण्यात यावा. यात (तलाकपूर्वी) विभक्त राहण्याचा कालावधी किमान तीन महिने असावे, असे सुचविले आहे. ही पद्धत स्त्रिया आणि पुरुष दोघांसाठीही लागू असावी.

२)या पद्धतीने तलाक न देता एखाद्या पुरुषाने पत्नीला तोंडी तलाक तडकाफडकी दिल्यास त्याच्यावर इतर दिवाणी कायद्यांनुसार कारवाई व्हावी. गुन्हा जामीनपात्र व अदखलपात्र असावा.

३) तिहेरी तलाक म्हणजे प्रत्यक्ष घटस्फोट नव्हे. त्यामुळे पुरुष पती म्हणून कायम राहील. तसेच, त्याला पत्नीला पोटगी देणे बंधनकारक असेल. तसेच, या काळात पत्नी माहेरी राहील.

हलाला आणि मुटा या पद्धतीही बेकायदा घोषित करण्यात याव्यात. मुटा पद्धतीच्या निकाहमध्ये आधीच तलाकची तरतूद केलेली असते. त्यामुळे ती देखील रद्द होणे आवश्यक आहे. हलाला आणि मुटासाठीही कायदेशीर कारवाईची तरतूद असावी. मात्र गुन्हा जामीनपात्र आणि अदखलपात्र असावा.

बीएमएमएने २००८ पासून देशभर या विषयावर चर्चा घडवून मुस्लिम कौटुंबिक कायद्याचा व्यापक मसुदा तयार केला आहे. या मसुद्याला अनुसरून सध्याच्या विधेयकात दुरुस्त्या केल्यास ते एनडीए सरकारने मुस्लिम महिलांसाठी केलेले खूप मोठे काम ठरेल.



# महिला सक्षमीकरणातील सावित्रीबाईंचे योगदान



**एकोणिसाव्या शतकात सावित्रीबाई फुले यांनी ओळखलेल्या महिलांच्या समस्या एकविसाव्या शतकातही कमी अधिक प्रमाणात कायम आहेत. अशावेळी त्यांनी दिलेले महिला सक्षमीकरणातील योगदान आपण खरेच अंगीकारले आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न अनुत्तरितच आहे.**



प्राची एक्के

आजची स्त्री ‘नव्या-जुन्या’सीमेवर रेंगाळणारी असली तरी ती संभ्रमित नाही आणि एकटी तर मुळीच नाही. शिक्षणामुळे, सकस वाङ्मयाच्या आस्वादाने ती कणखर झाली आहे. तिचे निर्णय ती घेऊ शकते. तिला सामाजिक बांधिलकीचे भान आले आहे. समाजाविषयीच्या कर्तव्याची जाण आली आहे. त्यामुळेच आजची स्त्री त्यादृष्टीने आपले कार्यक्षेत्र निवडताना दिसते, परंतु या सगळ्याची मुहूर्तमेढ रोवली ती क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांनी.

विद्या हे श्रेष्ठ दान आहे आणि ते स्त्री आणि पुरुष या दोघांना सारखेच मिळावे हा विचार मांडला, रूजवला आणि त्यासाठी अपार यातना भोगल्या त्या ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी. समाजाचे ऋण फेडण्याची जबाबदारी आजची स्त्री घेताना दिसते. त्यासाठी ती विविध क्षेत्रात नेटाने आपले काम पार पाडते. स्त्रीविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी झटणाऱ्या समाजसुधारक आणि वाङ्मयसेवकांनी आजच्या स्त्रीला आशावादी केले. असा हा दुर्दम्य आशावाद निर्माण करण्यामध्ये सावित्रीबाई फुले यांचा मोलाचा वाटा आहे यात तीळमात्रही शंका नाही.

महिला सक्षमीकरणात सर्वांत महत्वाची बाब म्हणजे स्त्रीला माणूस म्हणून जगण्याची संधी देऊन तिला तिचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास प्रोत्साहन देणे. महिला सक्षमीकरणाचा अर्थ महिलांना भीक नको आहे, कोणाची दया नको आहे, तर त्यांना पुरुषांप्रमाणे समान संधी हवी आहे. यासाठीच महिला सक्षमीकरण महत्त्वाचे ठरते आणि हे साध्य करण्यासाठी सर्वांत महत्त्वाचा टप्पा होता स्त्री शिक्षण. हे ओळखूनच सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला. त्यामुळेच समाजाचा आधार असलेली आजची स्त्री पुरुषाच्या बरोबरीने मुक्ती लढा व समतेचा लढा देण्यास सज्ज झाली. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती आंदोलनाची पहिली अग्रणी, पहिली स्त्री शिक्षिका व पहिली मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले, यांनी मुलींच्या शिक्षणासाठी अनेक प्रकारचा त्रास सहन केला. स्त्रियांनी शिकावे हेच सावित्रीबाई फुले यांचे ब्रीदवाक्य होते.

महाराष्ट्रात स्त्रीसुधारणाविषयक विचारांच्या प्रतिपादनाला एकोणिसाव्या शतकात सुरुवात झाली. त्या वेळी केवळ स्त्रियांचे प्रश्नच नव्हते तर जातिभेद निषेध, शिक्षण प्रसार, अन्य सामाजिक सुधारणा हे प्रश्नही ऐरणीवर होते. एकोणिसाव्या शतकात स्त्री एक अबला, उपभोग्य वस्तू आणि मुके जनावर म्हणून गणली जात असे. मुलीचा जन्म म्हणजे दैवाने आपल्यावर आणलेले मोठे संकट आहे, अशीच मुलीच्या आईवडिलांची धारणा असे. मुलीचे लग्न आठव्या-नवव्या वर्षापर्यंत झाले नाही तर आई-वडील चिंताक्रांत होत.



लग्नासाठी भरमसाट खर्च करण्याची पद्धत होती. स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा तर नव्हतीच मात्र लाजिरवाणे आणि म नहानीचे जिणे त्यांच्या वाट्याला येत असे. अशा वेळी स्त्रीला शिक्षणाच्या माध्यमातून एक नवी दिशा, नवसंजीवनी देण्याचे काम क्रांतिज्योती सावित्रीबाई
फुले यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले एकोणिसाव्या शतकातील फार मोठे समाजसुधारक होते. समता प्रधान समाज निर्माण व्हावा यासाठी त्यांना मनापासून तळमळ वाटत असे. त्यांनी स्वत: आपल्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाई फुले यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावेत म्हणून समाजाला चालना दिली. त्याची सुरुवात त्यांनी स्वत:च्या घरापासून केली. पुण्यात शिक्षणाची सोय नव्हती म्हणून ज्योतिबांनी सन १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यानंतर केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. या शाळेत शिकवण्यासाठी शिक्षिका मिळत नसल्याने ज्योतिबा फुले यांनी आपल्या अशिक्षित पत्नीला म्हणजे सावित्रीबाई फुले यांना घरी लिहायला आणि वाचायला शिकवले आणि पुढे त्यांची शिक्षिका म्हणून नेमणूक केली.

सावित्रीबाईंनीही ज्योतिबांच्या कार्यात त्यांना उत्तम साथ दिली. अनेक छळ, टीका सहन करून समाज सुधारणेचे काम नेटाने केले. अनेक अडचणी येऊनही आपल्या कार्यापासून त्या डगमगल्या नाहित. खरे तर स्त्री ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे, असेच ज्योतिबांनी कायम सावित्रीबाईंना सांगितले. त्यांना घरातूनच खूप मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले. ज्योतिबांच्या वडिलांनीच या कामासाठी मोठा विरोध केला. मात्र त्यांचा विरोध पत्करून सावित्रीबाईंनी आपले काम सुरू ठेवले. शिक्षिकेचे काम करत असताना त्यांचा मानसिक आणि शारीरिक छळही झाला. त्यात समाज, सनातनी जसे होते तसेच त्यांचे नातेवाईकही होते. रस्त्यातून जाताना त्यांना लोकांकडून शिवीगाळ होत असे. घरातील कचरा, शेणाचे गोळेही त्यांच्या अंगावर फेकण्यात आले; पण त्यांनी या सगळ्याकडे कधीच लक्ष दिले नाही. अशा संकटांना तोंड देण्यास त्या समर्थ होत्या.

त्यांनी स्थापन केलेल्या मुलींच्या शाळेत मुलींची संख्या हळूहळू वाढू लागली. पुण्यात त्या काळात हा चर्चे



चा विषय होता. या कार्यामुळे समाजात सावित्रीबाईंच्या नावाचा दरारा निर्माण झाला. संत चोखामेळा मंदिरात त्यांनी दीन-दलितांसाठी शाळा काढली. त्यांच्या या कार्याबद्दल इंग्रज सरकारने त्यांचा गौरव केला. त्यांना स्वत:चे अपत्य नव्हते. त्यामुळे दीन-दलितांना आणि अनाथांना जवळ करून सावित्रीबाईंनी त्यांच्यावर पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम केले.

सावित्रीबाई फक्त बोलतच नव्हत्या तर तशा वागतही होत्या. त्यांनी आपले विचार प्रत्यक्ष कृतीत आणले. त्या काळात बालविवाहाच्या रूढीमुळे मुलींना अकाली वैधव्य येत असे. अशा विधवा मुलींचे जिणे म्हणजे नरकापेक्षाही भयंकर होते. त्या काळात अशा विधवा महिलांचे केशवपन होत असे. त्या स्त्रीला अपशकुनी समजले जात. तिला पांढरे वस्त्र परिधान करावे लागत असे. बाल-विधवांचे दु:ख त्यांना जाणवले होते. त्यांना घरात कोंडून ठेवले जात असे. हे स्त्रियांचे दु:ख सावित्रीबाईंनी जवळून पाहिले होते. केशवपनाची दुष्ट प्रथा नष्ट झाली पाहिजे असे त्यांना वाटे, पण समाज हे मान्य करायला तयार नव्हता. त्यावेळी सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी नाभिक समाजाची सभा बोलावली आणि आपण आपल्याच भगिनींवर वस्तरा चालवतो, हे मोठे पाप आहे याची जाणीव करून दिली. नाभिक समाजानेही त्यांना पाठिंबा दिला. सावित्रीबाईंनी विधवा पुनर्विवाह घडवून आणणारी सभा स्थापन केली. त्यामध्ये हळदी-कुंकू, समारंभ, रसपान, प्रौढ स्त्रियांचे शिक्षण आणि स्त्रियांवर होणारा अन्याय या विषयांवर चर्चा व उपाय सुचवले जात असत. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न केले. त्या काळात स्त्री अर्भकहत्याही सर्रास घडत होत्या म्हणून बालहत्या प्रतिबंधगृह स्थापन केले. अशी अनेक कामे सावित्रीबाईंनी कल्पकतेने पार पाडली.

सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर (इ. स.१८९०) सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. इ. स. १८९३ साली सत्यशोधक समाजाचे मोठे अधिवेशन सासवडला भरले होते. त्याच्या अध्यक्षा सावित्रीबाई होत्या. त्यावेळी त्यांनी परखडपणे आपले विचार मांडले. इ. स. १८९६ सालातील दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी

शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांना सोडवून त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रय दिला. त्या काळात त्यांनी खूप कष्ट केले. अनाथांना आश्रय मिळावा यासाठी त्यांनी खूप मोलाचे काम केले.

आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातूनही केला. 'काव्यफुले' व 'बावनकशी,' 'सुबोध रत्नाकर' हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली.

इ. स. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगची साथ आली होती. सावित्रीबाई फुले यांनी या साथीच्या रोगाची तीव्रता ओळखून प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या, अशा प्रकारे प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना या दुर्धर रोगाने त्यांनाही ग्रासले आणि त्यातच १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

सावित्रीबाईंच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन 'बालिका दिन'म्हणून साजरा केला जातो. अशा प्रकारे निश्चितच सावित्रीबाई फुले भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री होत्या. म्हणूनच महिला सक्षमीकरणातील त्यांचे योगदान हे निर्विवाद आहे.

त्यांच्या कवितेतूनही स्त्री शोषण आणि पुरुषप्रधान संस्कृतीवर प्रहार केला गेला आहे. त्या म्हणतात,

**रुप तियेचे करी विच्छिन्न**
**नकोसे केले तिजला त्याने**
**शोषून काढी मध तियेचा**
**चिपाड केले तिला तयाने**

आता प्रश्न फक्त एकच आहे की आजही ही परिस्थिती पूर्णपणे बदललेली दिसते का? एकोणिसाव्या शतकात सावित्रीबाई फुले यांनी ओळखलेल्या महिलांच्या समस्या एकविसाव्या शतकातही कमी अधिक प्रमाणात कायम आहेत. अशावेळी त्यांनी दिलेले महिला सक्षमीकरणातील योगदान आपण खरेच अंगीकारले आहे का, हा महत्वाचा प्रश्न अनुत्तरितच आहे.



**प्रातिनिधिक फोटो.**



# मैत्रीही टिकली, पैसेही मिळाले...

**पैसे घेऊन दोन वर्षं उलटली होती. त्यामुळे आजींचे पैसे परत द्यावे लागतील, आपल्याला त्याबाबत कोणी विचारेल याची कल्पना दिनकरकाकांनी स्वप्नातही केली नव्हती. महिला आयोगाकडून नोटीस मिळताच ते हडबडले. आयोगाच्या मध्यस्थीमुळे पैसे परत मिळाल्यानंतर आजींना झालेला आनंद पाहून कर्मचाऱ्यांच्याही डोळ्यांत पाणी आलं.**



धनंजय बिजले

कांताबाई आता चांगल्या ८२ वर्षांच्या झाल्यात. डोक्यावरचे केस तर कधीचेच पांढरे झालेले. चेहऱ्यावरच्या सुरकुत्या त्यांच्या वयाची साक्ष देत असल्या तरी त्यांनी ऐंशी ओलांडलीय, असं त्यांना भेटणाऱ्याला सांगूनही पटत नसे. कारण आजींची बुद्धी या वयातही चांगलीच तल्लख. स्वभाव विनोदी, गप्पा मारण्याची भलती आवड. दुसऱ्यांना मदत करण्याचीही भारी हौस. त्यामुळे आजींना मित्र, मैत्रीणी भरपूर. वयोमानानुसार त्यांच्या शारीरिक हालचाली कमी झालेल्या असल्या तरी आजीबाई न चुकता सकाळी जवळच्या बागेत फिरायला जायच्याच. संध्याकाळी गणपतीच्या देवळातील आरतीही त्या कधी चुकवायच्या नाहीत. तिथेच त्यांना भरपूर मित्र-मैत्रिणी मिळाल्या. त्यामुळे त्यांचा दिवस छान जायचा. नवरा, मूल-बाळ नसल्याने त्यांचे जीवन तसे एकाकीच होतं, पण मित्र-मैत्रिणींमुळे त्यांना एकाकीपणाचे फारसं वैषम्य कधी वाटायचं नाही.

शासकीय नोकरीतून निवृत्त झाल्यानं त्यांना किरकोळ का असेना पण बऱ्यापैकी फंड मिळाला होता. तसेच निवृत्तिवेतन सुरू होतं. त्यातून त्यांचा दैनंदिन घरचा तसेच औषधपाण्याचा



खर्च भागायचाच. यातून काही रक्कम शिल्लकही रहायची. आजीबाई जुन्या जमान्यातील असल्याने पै पै साठवून ठेवायची, योग्य ठिकाणीच आवश्यक तितकेच पैसे खर्चायचे ही वृत्ती अंगी भिनलेली. आजच्या तरुणाईला कितीही पैसे दिले तरी कमीच पडतात, पण जुने, वयस्कर लोक जास्त पैसे असले तरी उधळमाधळ करत नाहीत. वर्षाकाठी एखाद-दुसराच कपडा खरेदी करतात. खर्च करणारे शौक तर त्यांना नसतातच. त्यामुळे हे वयोवृद्ध लोक नेहमी मिळणाऱ्या पैशांतील निम्मा हिस्सा जपून ठेवतातच. एक वेळ ते आपल्या मुला-बाळांना, नातवांना हातखर्चाला, त्यांच्या वाढदिवसाला, सणावाराला पैसे देतील पण स्वस्तः साठी काही खर्च करत नाहीत. आपल्या आजूबाजूला असे अनेक आजी-आजोबा आपल्याला पहायला मिळतात. कांताबाईसुद्धा यातल्याच एक. त्यांना तर तसे जवळचे नातेवाईक कोणी नव्हतेच. त्यामुळे त्यांचे पैसे बऱ्यापैकी साठत. त्या हे पैसे बँकेतच ठेवत.

रोज सकाळी बागेत फिरायला जात असल्याने तेथे त्यांचा मित्र-मैत्रिणींचा चांगलाच गोतावळा तयार झाला होता. त्यातील काही समवस्क तर काही त्यांच्या तुलनेने तरुण म्हणजे साठीतील म्हणा ना... कारण कांताबाईंसाठी साठ हे वय तसे तरुणच की... प्रत्येक जण आजीबाईंची दररोज विचारपूस करायचा, त्यांच्याशी गप्पा मारायचा. कधी कधी सल्ला मागायचा तर कधी सल्ला द्यायचा. यातूनच साठीतल्या एका तरुण वृद्ध जोडप्याशी त्यांची चांगलीच गट्टी जमली. दिनकरकाका आणि लक्ष्मीआजी असं या जोडप्याचं नाव. याच नावाने लोक त्यांना ओळखत. या जोडप्याशी कांताबाई दररोज मनसोक्त चेष्टामस्करी करत गप्पा मारत. कोवळ्या उन्हात या तिघांचा गप्पांचा रंगलेला फड पाहून अनेकांना हेवा वाटे. यातूनच त्यांचा ऋणानुबंध, स्नेह वृद्धिंगत होत गेला.

आता ते केवळ बागेत फिरायला आल्यावर बोलायचे अशातच भाग नव्हता. दिवसभरात अनेकदा फोनवरूनही ते हितगुज करत. हालहवाल जाणून घेत. खरे तर ते तसे फार जवळ रहात नव्हते, पण या बागेमुळे ते चांगलेच जवळ आले होते. कांताबाईंची साठीतील दिनकरकाकांशी फारच चांगले मित्रत्वाचे नाते जमले. एखादा दिवस कांताबाई फिरायला आल्या नाहीत बाकीचे लोक फक्त अरे आजी आज दिसत नाहीत इतके म्हणून सोडून देत. पण दिनकरकाका दुपारी एखादा फोन नक्की करत. तेही कांताबाईंना आजीबाईच म्हणत. अरे आजी आज फिरायला आला नाही, तब्येत ठिक आहे ना..अशी चौकशी करत. कांताबाईंना हे चार शब्दही मोलाचे वाटत. त्यांना यामुळे फार बरे वाटत असे. समजा दिनकरकाका व वहिनी आल्या नाहीत तर कांताबाईदेखील फोन करून विचारपूस करत. हा सिलसिला सुरूच होता.

एकदा बागेत फिरताना सकाळी दिनकरकाका चांगले चिंताग्रस्त झालेले कांताबाईंना दिसले. गप्पा मारण्यात काही केल्या त्यांचे मनच रमत नव्हते. कातंबाईनी चौकशी केली पण तरीही त्यांनी याचे कारण काही सांगितले नाही. त्यांचा कसला तरी व्यवसाय आहे एवढेच कांताबाईना माहिती होते. दोन दिवस झाले तरी दिनकररावांची चिंता कायमच

होती. कांताबाईंनी मग जरा वडीलधाऱ्या सुरात त्यांना जणू खडसावूनच विचारले. तेव्हा दिनकरकाका म्हणाले जरा पैशांची मोठी अडचण निर्माण झालीय. किमान दीड-दोन लाख रुपये तरी लगेच लागणार आहेत.

कांताबाईदेखील काळजीत पडल्या. दोन दिवस तसेच गेले. दिनकरकाकांप्रमाणेच कांताबाईही अस्वस्थ झाल्या होत्या. दुसऱ्याच दिवशी दिनकरकाकांना त्या म्हणाल्या, हे पाहा मी आता ८० वर्षांची झालेय. मला जवळचे म्हणाल तर तसं कोणीच नाही. माझा मुलगा असता तर मी त्याला पैसे दिलेच असते की. तेव्हा माझ्याकडे बँकेत आता एक - दीड लाख रुपये आहेत. तुम्हाला मी ते देते. तुमचे काम झाले की मला तुम्ही परत द्या. काकांनी त्याला क्षणात होकार दिला आणि कांताबाईंना तडक बँकेतच नेले. कांताबाईंनी बँकेतील लाखाची एफडी मोडली, बचत खात्यावरची पन्नास हजारांची पुंजी काढली व दीड लाख रुपये दिनकरकाकांच्या हाती ठेवले. दिनकरकाकांचा प्रश्न क्षणात सुटला. चेहऱ्यावर चिंता पळून गेली व हास्याची लकेर उमटली. तीन महिन्यांत पैसे देण्याचे वचन त्यांनी कांताबाईंना दिले. कांताबाई म्हणाल्या, द्या हो मला कशाला पैसे लागतात. तुमची काळजी मिटली ना तेच माझ्यासाठी पुरेसं आहे. मला काही झाले तर तर तुम्ही आहातच की. आणि काळजी करू नका सहा महिने तरी मी नक्की ठणठणीत राहीन. मला हॉस्पिटलमध्ये नक्की जावं लागणार नाही. तोवर तुम्ही पैसे परत द्यालच.

त्यानंतर दिवसामागून दिवस जात राहिले. दोघेही दररोज भेटायचे, ख्यालीखुशाली जाणून घ्यायचे. पैशांचा विषय़ कांताबाईंनी कधीच काढला नाही. बघता बघता चार महिने उलटून गेले. दिनकरकाकांनीही पैशांचा विषय काढला नाही. सात महिने उलटल्यावर मात्र कांताबाई म्हणाल्या, अहो माझे पैसे आता परत द्या. तुमची गरज भागली आता मी पुन्हा एफडी करते. तेवढेच व्याजाचे चार पैसे मिळतील. दिनकरकाका म्हणाले, हो देतो की त्यात काय. थोडा वेळ लागला त्याबद्दल माफ करा पण एक महिन्याभरात नक्की देतो. झालं. पुन्हा दोन महिन्यांचा काळा तसाच गेला. पण पैशाचे नावच नाही. आता मात्र कातांबाई जरा नाराजीच्या सुरात दिनकरकाकांना म्हणाल्या, हे काही बरं नाही...तुमच्या गरजेच्या वेळी मी पैसे दिले आणि तुम्ही मात्र परत देण्याचे नावच काढत नाही. असे झाल्यावर ओशाळल्या स्वरात दिनकरकका म्हणाले अहो देतो काळजी करू नका. पण झालं उलटंच दुसऱ्या दिवशीपासून दिनकरकाका फिरायला यायचेच बंद झाले.

दोन - चार दिवस झाल्यावर कांताबाईंनी फोन केला. जरा ताप आल्याने आलो नाही असे त्यांनी सांगितले. पण आता दिनकरकाकांच्या मनात वेगळेच विचार सुरू झाले होते. दीड लाख देण्याची त्यांची इच्छाच होत नव्हती. म्हातारीला कशाला लागतेते पैसे असे मनातल्या मनात ते म्हणू लागले. बर पैशांच्या व्यवहाराचा कोणताच पुरावा कांताबाईंकडे नव्हता. त्यामुळे त्या काही करू शकणार नाहीत, हे दिनकरकाकांच्या हिशेबी मनानं ताडलं. त्यामुळे त्यांनी फिरायला जायचे जवळपास बंदच केले. कांताबाईंनी फोन केला की ते काही तरी वेळ मारून नेत. नंतर नंतर त्यांनी कांताबाईंचे फोन उचलणंच बंद केलं. पुढे पुढे ते आजींचे फोन कट करू लागले. आता मात्र कांताबाई अस्वस्थ झाल्या. पैसे देऊन जवळपास पावणेदोन वर्षे झालेली. परत मिळणार की नाही याची काहीच शाश्वती आजींना दिसेना. बरं कोणाला सांगायची सोय नाही. कारण कोण विश्वास ठेवणार. बरे साठीतल्या या मित्राविषयी अजूनही त्यांच्या मनात एक हळवा कोपरा होता. त्यामुळे त्या दुसऱ्यांना हा विषयच सांगत नसत. कशाला त्यांची नाचक्की करायचा हा उदात्त हेतू त्यांच्या मनात होता. ८० पावसाळे पाहिलेल्या या आजीने कधी पोलिस चौकीची की कोर्टाची पायरी चढली नव्हती. त्यामुळे आजींना काय करावेच हेच सुचेना. बरं तिथे जाऊन त्यांचे ऐकणार तरी कोण असा प्रश्न होता. कारण पैसे दिल्याचा साधा कागदी पुरावाही त्यांच्याकडे नव्हता. दिनकरकाका तर फोनच उचलत नसत त्यामुळे रात्र रात्र त्यांना झोप लागत नसे. शिवाय रक्कम काही थोडी नव्हती.

गप्पातून कधी तरी महिला आयोगाचं नाव त्यांच्या कानी पडले होते. त्यांनी महिला आयोगाला आपली ही व्यथा मोडक्या तोडक्या शब्दांत लिहून पाठवली. आयोगाच्या समुपदेशकांनी आजींना फोन केला व कार्यालयात बोलावले. आजींनी डोळ्यात पाणी आणून सारं काही सांगितले, पण दिनकरकाका माझे चांगले मित्र आहेत त्यांना त्रास मात्र देवू नका असे सांगण्यासही त्या विसरल्या नाहीत. इतकं सार होऊनही आजींच्या मनातील चांगलुपणा कायम होता याचीच ही साक्ष होती. खरं तर कोणताच लेखी पुरावा नसल्याने

त्यांची तक्रार अन्य कोणी ऐकूनच घेतली नसती, पण त्यांचे डोळे सारं काही सांगत होते. दिनकरकाकांच्या फोन क्रमांकावरून पत्ता शोधून काढत आयोगाने त्यांच्या घरी नोटीस पाठवली व त्यांना बोलावून घेतले.

आता पैसे घेऊन दोन वर्षं उलटली होती. त्यामुळे आजींचे पैसे परत द्यावे लागतील, आपल्याला त्याबाबत कोणी विचारेल याची कल्पना काकांनी स्वप्नातही केली नव्हती. नोटीस मिळताच ते हडबडले. तडक आयोगाच्या कार्यालयात आले. आजीबाईंना पाहताच त्यांचं अवसानंच गळाले. सुरुवातील त्यांनी पैशांबाबत का कू केली, पण नंतर मात्र आजींकडून पैसे घेतल्याचे त्यांनी कबूल केलं. सध्या माझी अडचण असल्याने मला पैसे देता आले नाहीत, असं सागूंन वेळ मारून नेण्याचा प्रयत्नही केला. पण समुपदेशकांनी कान टोचल्यानंतर पैसे देण्याचे कबूल केले. इतके होऊनही त्यांना त्रास देऊ नका, ते माझे मित्रच आहेत, अशी आजींची भावना आहे, हे समुपदेशकांनी काकांना सांगितलं. सधाच्या काळात असे पहायला मिळतच नाही हेही काही कमी नाही हे समुपदेशकांनी काकांना पटवून दिले.

शिवाय पैसे चेकने देण्यास सुचवले. जेणेकरून पैसे दिल्याचा पुरावा राहील. हे सारे झाल्यावर काकांनी दोन हप्त्यांत पैसे देऊ, असं आयोगाकडे लिहून दिलं. काकांनी नंतर दोन महिन्यांच्या कालावधीत ६५ हजार रुपयांचे दोन धनादेश आजींच्या हवाली केले. कोणत्याही कटूतेशिवाय रक्कम मिळाल्याचा आनंद ८२ वर्षांच्या आजींच्या चेहऱ्यावर पाहायला मिळाला तेव्हा आयोगाच्या कर्मचाऱ्यांचेही मन भरून आले.





# सिगारेटच्या थोटकापायी....

**सिगारेटच्या व्यसनापायी तिचा संसार उद्ध्वस्त होण्याची वेळ आली होती. महिला आयोगानं या प्रकरणात महत्त्वाची भूमिका बजावली. तिला तिच्या चुकीची जाणीव करून व्यसन सोडायला सांगितलं आणि तिला मदत करण्यासाठी सासरच्या मंडळींना राजी केलं.**



धनंजय बिजले

चांगलं सुस्थितलं उच्चभ्रू चौकोनी कुटुंब. प्रशस्त बंगला, बाजूला बगीचा. दारात चारचाकी मोटार. आई-वडलांचा एकुलता एक मुलगा. शिकला सवरला. आयटी इंजिनियर झाला. चांगलं स्थळ चालून आलं. एकमेकांच्या पसंतीनंतर मुलानं चांगली उच्चशिक्षित थोडी मॉडर्न, मोठ्या शहरातली वधू पसंत केली. दोन्हीकडच्या घरच्यांच्या पसंतीनंतर, रीतसर याद्या झाल्या. मुलीच्या घरच्यांनी थाटामाटात लग्न लावून दिले. रीतीभातीनुसार सारं काही केलं. खर्चात कशाचीही कमतरता ठेवली नाही. चांगले पंधरा एक लाख रुपये खर्च केले. मुलगी सासरी नांदायला गेली. तीही नव्या संसारात खूष होती. नवरा, सासू, सासरे हेच तिचे नवे विश्व झाले होते. ती सारे कामं आनंदानं करायची. शिकलेली होती पण सुरुवातीला काही दिवस नोकरी करायची नाही, असं नवरा- बायको दोघांनी ठरवले. घरची आर्थिक स्थिती तशी उत्तम असल्याने नव्या सुनेच्या या निर्णयाला कोणाचा विरोध असण्याचा तसा काही प्रश्न नव्हताच मुळी.

उलट सुनबाई घरात राहणार यामुळे सासू-सासरे मनातून



खूषच झाले. कारण सून नोकरीच्या चक्रात अडकली की तिची ओढाताण होणार हे त्यांना ठाऊक होतंच. सुनेनं नोकरी करू नये असं त्यांचं मत नव्हतं, पण थोडे दिवस तिने नव्या संसाराचा आनंद लुटावा, मौजमजा करावी, एखादं मूल झाले की त्याचे काही वर्षे संगोपन करावं मग नोकरी करावी असंच त्यांना वाटत होते. त्यामुळे तिच्या घरात राहण्याला कोणी विरोध केलाच नाही. त्यामुळे हे चौकोनी कुटुंब हसतखेळत जगू लागले. गप्पांत रंगू लागले. नव्या सुनेला स्वयंपाकाची, घर सजवायची भारी हौस. तिचे घरात चांगलेच लाड होत होते. सासू- सासरे तिला घरकामात जमेल तशी मदत करत. घर, बाग स्वच्छ करण्याची, झाडण्याची सारी जबाबदारी सासूनेच स्वतःकडे घेतलेली, तर भाजी, दूध अन्य खरेदी सासरे करत. तीही नवऱ्यासह सर्वांच्या आवडीचे पदार्थ बनवत असे. त्यांना मनापासून खाऊ घालत असे. त्याचबरोबर तिला नटण्याची, ब्यूटी पार्लरला जाण्याची शिवाय जीन्स-टी शर्टची आवड. अर्थात तिचे सासरही शहरातच असल्याने याबाबतही तिला कोणी विरोध केला नाही. त्यामुळे बाहेर फिरायला जाताना ती मस्त जीन्स-टी शर्ट घालत असे. एकूण काय तर तिचा संसार फार छान चालला होता.

पण एक दिवस बाग झाडताना सासूबाईंना सिगारटचे थोटूक सापडलं. त्यांना अचंबा वाटला. त्यांनी ते उचलून टाकून दिलं. पुन्हा दोन दिवस गेले, पुन्हा तोच प्रकार. पुन्हा बागेत सिगारेटचा तुकडा. त्यांचा नवरा, मुलगा सिगारेट ओढत नाहीत हे त्यांना माहिती होतं. पण तरीही त्यांचा यावर आता विश्वास बसेना. त्यांनी पतीला जवळपास खडसावूनच विचारले. तुम्ही सिगारेट ओढता काय या प्रश्नाने ते बिचारे भांबावलेच. त्यांनी नकार दिल्यावर त्या दोघांनी मुलाला एकट्याला बाजूला घेत समजावण्याच्या सुरात विचारलं, बाळ तू सिगारेट केव्हापासून आणि कशी काय ओढू लागलास. तुझे नवं लग्न झाले आहे. बायको काय म्हणेल? तू घरातच असं वागू लागलास तर बाहेर काय करत असशील या शंकेनेच माझी झोप उडालीय, असे आईने म्हणताच मुलगा उडालाच. अगं आई मी कधी सिगारेटला हातही लावला नाही, असं त्यानं आईला सांगितलं. नवरा आणि मुलानेही हात झटकल्याने त्या हतबल झाल्या. पण सासूबाई चांगल्याच खमक्या होत्या. त्यांनी दोघांनाही बजावले. पुन्हा जर सिगारेट दिसली तर तुमची काही खैर नाही. पुन्हा दुसऱ्या दिवशीच तोच प्रकार. बागेत पुन्हा सिगारेट. आता मात्र त्यांची झोपच उडाली.

काही करून याचा आता छडा लावायचाच हे त्यांनी मनाशी पक्के ठरवले. कोणाला काही न सांगता त्यांनी मुलावर, नवऱ्यावर लक्ष देण्यास सुरुवात केली. एक दिवस दुपारी झोपल्या असताना त्यांना अचानक सिगारेटच्या धुराचा वास आला. बेडरूममधून बाहेर आल्यावर स्वयंपाकघरातून सिगारेटचा वास येत असल्याचं त्यांना जाणवलं. स्वयंपाकघरात वाकून पाहिल्यावर समोरचे दृश्य पाहून त्या जागच्या जागी थिजूनच गेल्या. स्वयंपाकघरात त्यांची सून सिगारेट ओढत होती. खरं तर त्या हादरल्याच. त्या दिवशी त्या कोणाला काहीच बोलल्या नाहीत. दुसऱ्या दिवशी दुपारी पुन्हा हेच. मग त्यांनी हा प्रकार पतीच्या निदर्शनाला आणला. सुनेचा हा प्रताप पाहून त्यांना काही सुचेनाच. या दोघांनी हा प्रकार मुलाच्या कानावर घातला. झाले घराचा सारा नूरच पालटून गेला. घरचं वातावरण बिघडून गेले. मी सिगारेट ओढत नाही, असाच पवित्रा सुनेनं घेतल्याने सारेच हतबल झाले.

चांगल्या हसऱ्या खेळत्या घराला जणू सिगारेटचीच दृष्ट लागली. घरातलं हसरं वातावरण कधीच संपलं. रोज भांडणं



होऊ लागली. रोजच्या शाब्दिक कटकटींनी सर्वांचंच जगणं मुश्कील झाले. भांडणं विकोपाला जाऊ लागली. सासूने तर असली सून आम्हाला नकोच असा पवित्रा घेतला व मुलाच्या घटस्फोटाची तयारी सुरू केली. त्यांनी थेट महिला आयोगच गाठला. एका सिगारेटपायी सारे घर उध्वस्त होण्याची वेळ आली होती. प्रसंग बाका होता. मुलीने सिगारेट ओढत नसल्याचे स्पष्टपणे सांगितले होते तर सासू-सासरे हीच सिगारेट ओढते, यावर ठाम होते. कोण नेमके खरे कोण बोलतेय आणि खोटे कोण हेच कळेनासे झाले होते. सासू आणि सून दोघीही आपापल्या भूमिकेवर ठाम होत्या.

आयोगाच्या समुपदेशकांपुढे असा प्रसंग प्रथम उद्भवला होता. नव्या जीवनशैलीचा हा परिणाम होती. आज काल शहरात मुली सिगारेट सर्रास ओढतात. त्यांना तसेच त्यांच्या मित्र-मैत्रिणींना त्याचे काही वाटत नाही. उलट मुलांप्रमाणे आपण मस्त, बिनधास्त आयुष्य जगतोय अशी त्यांची धारणा असते, पण यातून पुढे आयुष्यात होत्याचं नव्हतं होऊ शकतं याचं भान त्यांना राहात नाही. इथेही तसंच काहीसं झालं होतं. शिवाय सिगारेटसारखं व्यसन एका रात्रीत सुटणे अशक्य असतं. त्यामुळे अशा व्यसनांच्या नादी न लागणे यातच खरे हित असतं, पण कॉलेजात असताना नवा जोश असतो. मौज मजा, पार्टी कल्चर यामुळे आजच्या तरुणाईच्या जगण्याच्या कल्पनाच बदलू लागल्या आहेत. वीकेंडला पार्टी, रोज चहाबरोबर सिगारेटचा झुरका हे कॉलेजांत दिसणारं चित्र आहे. एखादा मुलगा किंवा मुलगी सिगारेट ओढत नसेल तर त्याला बाकीचे वेड्यात काढतात. त्यामुळे तोही मग या व्यसनांच्या जाळ्यात कळत नकळत ओढला जातो. इथंही असंच काहीसं झालं होते. पण ही मुलगी सिगारेट ओढतेय हे मान्य करण्यास तयारच नव्हती. कारण तिला संसार टिकवायचा होता.

इथं तिच्या अपरोक्ष समुपदेशकांनी मुलीच्या मैत्रिणींकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. साध्या गोष्टीमुळे तुमच्या मैत्रिणीचा संसार धोक्यात आलाय हे सांगितल्यावर त्यांनी मग होय आमची मैत्रीण रोज एक सिगारेट ओढते, हे त्यांनी सांगितले. त्यामुळे घरात सूनच सिगारेट ओढतीय हे स्पष्ट झाले. समुपदेशकांनी मग मुलीला एकटीला थोडे प्रेमाने, थोडे रागावून विचारले. त्यावेळी मुलगी घळाघळा रडूच लागली. होय, मी कधी तरी सिगारेट ओढते. मला खरं तर सिगारेट ओढायची नाहीयेय. पण काय करू हे व्यसन आता सुटतच नाही. मला माझा संसार प्यारा आहे. नवरा, सासू, सासरे सगळे चांगले आहेत. पण रोज एखादी सिगारेट ओढल्याशिवाय मला चैनच पडत नाही. सिगारेट सोडण्याचा खूप प्रयत्न केला पण काही केल्या सुटत नाही. नाही ओढली की चैन पडत नाही. त्यांना मी हे कोणत्या तोंडाने सांगू. त्यामुळे मी रोज एखादी सिगारेट चोरून ओढते. माझ्या आई वडिलांनी लग्नात मोठा खर्च केलाय. शिवाय सासर चांगले आहे. तुम्हीच यातून काहीतरी मार्ग काढा अशी विनवणी तू करू लागली.

ही सारी बाजू कळल्यावर आयोगाच्या लोकांची जबाबदारी आणखी वाढली. प्रश्न होता तो चिडलेल्या सासरकडच्या मंडळींना शांत करण्याचा, सारं समजावून सांगण्याचा. आता त्यांच्या समंजसपणाची खरी कसोटी होती. समुपदेशकांच्या समजावण्यामुळे त्यांनाही नव्या जीवनशैलीतून निर्माण होत असलेल्या समस्यांची जाणीव झाली. सासरचे लोकही अंतर्मुख झाले. जेव्हा बाहेर असे काही घडते त्यावेळी त्याचे कोणाला काही वाटत नाही. पण हाच प्रसंग जेव्हा आपल्या घरात घडतो त्यावेळी त्याची भयानकता जाणवते. आपली बायको किंवा सून सिगारेट ओढतेय हे कोणत्याच कुटुंबाच्या पचनीच पडण्यासारखे नाही. पण तिला यातून बाहेर पडायचेय, त्यासाठी तिच्या परीने ती प्रयत्नही करतेय. गरज आपल्या आधाराची आहे हे समजावल्यावर ते थोडे शांत झाले. शेवटी सिगारेट सोडल्यास त्यांचीही मुलीविषयी काही तक्रार नव्हतीच. इथं महिला आयोगाने महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. दोन्ही बाजूंना त्यांनी मोठ्या कसोशीने परिस्थितीचं भान आणून दिलं. मुलीलाही तिच्या चुकीची जाणीव करून दिली. साध्या व्यसनापायी तू सारी सुखं गमावून बसशील. तेव्हा वेळीच डॉक्टरांच्या सल्ल्याने व्यसनातून मुक्त हो, हे त्यांनी तिला पटवून दिलं. सासरकडच्यांनाही थोडं धीराने, संयमाने घेण्यास, सुनेला व्यसनापासून मुक्त होण्यासाठी मदत करण्यास राजी केलं. महिला आयोगाच्या या भूमिकेमुळे आज हे कुटुंब पुन्हा पहिल्यासारखे एक आले आहे. हसत खेळत जीवन व्यतीत करत आहे.

# जबरदस्त ‘पुश’

**प्रत्येक आस्थापनात आयसीसी स्थापन करण्यास चालना मिळावी, या हेतूने महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पीपल युनायटेड अगेन्स्ट सेक्शुअल हॅरॅसमेंट (‘पुश’) नावाचा उपक्रम गेल्या वर्षी जानेवारीमध्ये सुरू केला. या उपक्रमाचा आढावा...**



**साद प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ ही समाजातील अत्यंत गंभीर समस्या बनली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयानेही या समस्येची गंभीर दखल घेऊन प्रत्येक आस्थापनमध्ये लैंगिक छळ प्रकरणी अंतर्गत चौकशी समिती (आयसीसी) स्थापन करण्याचा आदेश दिला आहे. त्याला अनुसरून सर्व आस्थापनांनी या समित्या स्थापन करणे बंधनकारक आहे, मात्र अनेक ठिकाणी त्या स्थापन केल्या गेल्या नसल्याचे चित्र दिसत आहे.

या समित्या स्थापन करण्यास चालना मिळावी आणि लैंगिक छळाविषयी जनजागृती व्हावी, या हेतूने महिला आयोगाच्या अध्यक्ष मा. विजया रहाटकर यांनी पीपल युनायटेड अगेन्स्ट सेक्शुअल हॅरॅसमेंट (‘पुश’) नावाचा उपक्रम गेल्या वर्षी जानेवारीमध्ये सुरू केला. त्यात महिला आयोगाच्या सर्व सदस्य मा. नीता ठाकरे, मा. गयाताई कराड, मा. वृंदा कीर्तीकर, मा. देवयानी ठाकरे, मा. आशाताई लांडगे, पदसिद्ध सदस्य सतीश माथूर (राज्याचे पोलिस महासंचालक) आणि सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांचा सक्रिय पाठिंबा आणि सहकार्य मिळत आहे.

आयोगाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे पाठबळ आणि मा. अध्यक्षांची

उपक्रमशीलता या जोरावर गेल्या वर्षभरात राज्यांतील बारा प्रमुख विद्यापीठांमध्ये 'पुश' या उपक्रमाची माहिती देणाऱ्या कार्यशाळा राबविण्यात आल्या. त्यात औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (२१ फेब्रुवारी २०१७), नागपुरात संत तुकडोजी महाराज विद्यापीठात (२८ जानेवारी २०१७), नाशिकमध्ये सीएमसीएस कॉलेज (३० जानेवारी २०१७), नांदेडमध्ये (३० जानेवारी २०१७), पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (२ फेब्रुवारी २०१७), सोलापुरात सोलापूर विद्यापीठ (६ फेब्रुवारी २०१७), कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ (७ फेब्रुवारी २०१७), जळगावला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (१ फेब्रुवारी २०१७), अमरावती येथील संत गाडगे महाराज विद्यापीठ (९ फेब्रुवारी २०१७), गडचिरोलीतील गोंडवाना विद्यापीठ (१० फेब्रुवारी २०१७), मुंबईत मुंबई विद्यापीठ (१५ फेब्रुवारी २०१७) आणि मुंबईतच श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ (एसएनडीटी) (१८ फेब्रुवारी २०१७) येथे कार्यशाळा घेण्यात आल्या. या कार्यशाळांतून विद्यार्थिनी व शिक्षक तसेच इतर कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ म्हणजे काय? त्या विरोधात अंतर्गत चौकशी समित्या स्थापन करणे का आवश्यक आहे? या समित्यांची रचना कशी असते? त्यांचे कार्य कसे चालते? समित्यांचे अधिकार काय असतात, या विषयी तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आले. राज्यभरात मिळून ५३७० महिला, विद्यार्थिनींपर्यंत पोहोचण्यात महिला आयोग यशस्वी झाला.

पुढील काळात या उपक्रमाची व्याप्ती आणखी वाढविण्याचे प्रयत्नही आयोग करणार आहे. त्या योगे राज्यभरातील महिलापर्यंत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे शक्य होणार आहे.

**नागपुरातून या उपक्रमाची सुरुवात झाली. उद्घाटनपर समारंभाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्यासह संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू व्ही. व्ही. काणे, आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, विद्यापीठाच्या महिला विकास समितीचे अध्यक्ष आणि कॉम्प्लिकरो या संस्थेचे संस्थापक, संचालक विशाल केडिया उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| विद्यापीठांतर्गत येणारी कॉलेजे | ३१६ |
| कार्यक्रमातील सहभागी | ४१० |
| विदयापीठातील एकूण विद्यार्थिनी | १,४०,६७३ |

**“आपण मुलांना लहानपणीच योग्य वर्तन आणि वाईट वर्तन यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. हे काम आता तुमच्या प्रयत्नांतूनच शक्य होणार आहे. तुम्ही आज येथे जे काही शिकलात त्याचा उपयोग तुमच्या कॉलेजांत परतल्यानंतर तुम्ही करा.**

**विजया रहाटकर**
**अध्यक्ष, राज्य महिला आयोग**

**नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, महिला आणि बालकल्याण विभागाचे नांदेड विभागीय संचालक सुनील शिंगणे, नागरी विभागाचे संचालक डॉ ए. आय. शेख, कॉम्प्लिकरो या संस्थेचे संस्थापक, संचालक विशाल केडिया उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | २७१ |
| कार्यक्रमातील सहभागी | ३७० |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | ९२,७३१ |

**“ही केवळ माहितीपर कार्यशाळा नाही. अंतर्गत चौकशी समितीचे सदस्य या नात्याने तुम्हाला असणाऱ्या कायदेशीर अधिकारांची जाणीव आम्ही तुम्हाला करून दिली आहे. तुम्ही आता तुमच्या व्यवस्थापनालाही त्याची जाणीव करून द्याल, ही अपेक्षा.**

**डॉ. मंजूषा मोळवणे**
**सदस्य सचिव, राज्य महिला आयोग**

जळगावच्या कार्यक्रमात आयोगाच्या सदस्य देवयानी ठाकरे, सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, रमेश काटकर, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील, प्रशिक्षक विशाल केडिया उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | १२९ |
| कार्यक्रमातील सहभागी | ५० |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | ९९,२७६ |

" आज आपल्याला येथे जे काही ज्ञान मिळाले ते आपण आपापल्या संस्थांमध्ये घेऊन जाऊ आणि त्यानुसार बदल घडवू, जेणेकरून विद्यार्थ्यांचे लक्ष शैक्षणिक प्रगती आणि नवी ध्येये गाठण्याकडेच केंद्रित होईल.

**डॉ. पी. पी. पाटील**

कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठ

नाशिकमधील सीएणसीएस कॉलेजात झालेल्या कार्यक्रमात राज्य महिला हक्क रक्षण आयोगाचे सदस्य सचिव ए. एन. त्रिपाठी, आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, पुणे विद्यापीठातील विभागप्रमुख डॉ. अनघा तांबे आणि प्रशिक्षक विशाल केडिया उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | ४४५ |
| कार्यक्रमातील सहभागी | ५३७ |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | ३,६०,२११ |

" सध्या आपला समाज धोकादायक स्थितीत आहे. लहान मुलांचे लैंगिक शोषण केले जात आहे. जवळच्या अथवा परिचितांकडूनच हे शोषण अधिक प्रमाणात होते, असे आकडेवारी सांगते. ही विषवल्ली समूळ उखडून टाकण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

**डॉ. मंजूषा मोळवणे**

सदस्य सचिव, राज्य महिला आयोग

## सेंट मीरा कॉलेज फॉर गर्ल्स, पुणे

येथील कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजय रहाटकर, राज्य महिला हक्क रक्षण आयोगाचे सदस्य सचिव ए. एन. त्रिपाठी, आयोगाच्या उपाध्यक्षा डॉ. मंजूषा मोळवणे, पुणे विद्यापीठातील विभागप्रमुख डॉ. अनघा तांबे आणि प्रशिक्षक विशाल केडिया, सेंट मीरा कॉलेजचे प्राचार्य डॉ. गुलशन गिडवानी उपस्थित होते.

" आपण ज्यांना शिक्षण देऊन समाजात पाठवित आहोत, ते फक्त शिक्षित नाहीत, तर उत्तम प्रशिक्षित आहे. समाजात सकारात्मक योगदान देण्यासाठी आणि समाजातील सर्व घटकांना सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी ते सज्ज झाले आहेत, हा संदेश देण्यासाठी आता कॉलेजांनी पुढे आले पाहिजे.

**विजया रहाटकर**

अध्यक्षा, राज्य महिला आयोग

## सोलापूर विद्यापीठ

येथील कार्यक्रमाला आयोगच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, प्रशिक्षक विशाल केडिया, सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. पाटील, विद्यापीठाचे कुलसचिव आदी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | ८३ |
| कार्यक्रमातील सहभागी | ३०० |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | ४८,६१७ |



सोलापुरातील कार्यक्रम.

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

येथे झालेल्या कार्यक्रमाला आयोगाच्या उपाध्यक्षा डॉ. मंजूषा मोळवणे, प्रशिक्षक विशाल केडिया, विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, विद्यापीठातील महिला कल्याण समितीच्या अध्यक्ष डॉ. निरंजना चव्हाण आदी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | १९७ |
| कार्यक्रमातील सहभागी | ९६९ |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | १,६६,२९२ |

**"कामाच्या ठिकाणी लैंगिक छळप्रतिबंधक कायद्याचे पालन आपल्याकडून होत आहे आणि प्रत्येक दोषीवर कायद्याने कारवाई होईल हे आपण सुनिश्चित करू या. या नियमाची अंमलबजावणी लिंगनिरपेक्षतेने करणे आवश्यक आहे.**

**डॉ. डी. आर. मोरे**
**प्रभारी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

येथे झालेल्या कार्यक्रमाला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, प्रशिक्षक विशाल केडिया, मुंबई उच्च न्यायालयातील वकील श्री. चांदेकर, विद्यापीठातील महिला कल्याण समितीच्या अध्यक्ष सौ. गडकरी आदी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | २९८ |
| कार्यक्रमातील सहभागी | ९८० |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | १,३६,२८३ |

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

चंद्रपुरातील सरदार पटेल महाविद्यालयात येथे झालेल्या कार्यक्रमाला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. व्ही. कल्याणकर, आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, कॉलेजचे प्राचार्य आर. पी. इंगोले आदी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | १९२ |
| कार्यक्रमातील सहभागी | २०० |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | ६५, ६९१ |



## 'पुश' कशासाठी?

- कामाच्या ठिकाणचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्यानुसार तक्रारनिवारणासाठी प्रत्येक ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती (आयसीसी) आपण करणे बंधनकारक आहे. या समितीला अर्धन्यायिक अधिकार असल्याने ही समिती पिडीत महिलेला न्याय देऊ शकते. म्हणूनच तिचे महत्त्व अधोरेखीत होते.
- अनेक संस्था आणि संघटनांनी 'आयसीसी' स्थापन केलेल्या नाहीत, असे राज्य महिला आयोगाच्या निदर्शनास आले आहे.
- अनेक ठिकाणी बंधनकारक असूनही समित्या स्थापलेल्याच नाहीत. काही ठिकाणी समित्या स्थापन झाल्या आहेत, मात्र त्या निर्धारित प्रक्रियेनुसार कामकाज करीत नाहीत.
- काही संस्थांनी समित्या स्थापन केल्या परंतु त्यांचे कामकाज चालविण्यासाठी तेथे या तक्रारी हाताळण्यासाठी प्रशिक्षित व्यक्ती नाहीत.
- 'पुश' उपक्रमाद्वारे राज्य महिला आयोग सध्या सर्व संस्था आणि संघटनांपर्यंत पोहोचून जनजागृती करण्याचे काम करीत आहे.
- सर्व संस्था आणि संघटनांमध्ये कायद्याला अनुसरून समित्या स्थापन व्हाव्यात, जेणेकरून नोकरदार महिला, विद्यार्थिनी यांना मोकळे आणि सुरक्षित वातावरण मिळू शकेल आणि लैंगिक छळ करणाऱ्यांना त्यांच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा देता येईल.

आपण अनेक ठिकाणी कायद्याला अनुसरून समित्या स्थापन केल्या असल्या तरीही त्या योग्य रीतीने कार्यरत नसल्याचे या कार्याशाळेमुळे दिसून आले. आता आपण सुधारणा करून तक्रार निवारण योग्य पद्धतीने होईल, याची काळजी घेऊ या. विजेची उपलब्धता, सीटीटीव्ही बसविणे आदींसह आपल्याला सख्य असलेले सर्व उपाय करून सुरक्षित वातावरण निर्मिती करू या.

**डॉ. एन. व्ही. कल्याणकर,**
**कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ**

## मुंबई विद्यापीठ

येथे झालेल्या कार्यक्रमाला आयोगाच्या अध्यक्ष विजय रहाटकर, सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, प्रशिक्षक विशाल केडिया, विद्यापीठाचे कुलसचिव श्री. खान, बीसीयूडी संचालक डॉ. पाटील आदी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | ४८९ |
| कार्यक्रमातील सहभागी | २८४ |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | ४, ९२, ६८९ |

मुंबई विदयापीठ जगातील प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक आहे. आपण केवळ ज्ञानाधिष्ठित वक्ती घडविण्यापुरते मर्यादित न राहता चारित्र्यसंपन्न व्यक्ती घडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपले विद्यार्थी उत्तम नागरिक बनले पाहिजेत.

**विजया रहाटकर,**
**अध्यक्ष, राज्य महिला आयोग**

## एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

येथे झालेल्या कार्यक्रमाला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, प्रशिक्षक विशाल केडिया, विद्यापीठाच्या कुलगुरू शशिकला वंजारा, बीसीयूडी संचालक, विद्यापीठातील महिला कल्याण समितीच्या अध्यक्ष, कुलसचिव उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | १३१ |
| कार्यक्रमातील सहभागी | ४०० |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | २५,१९७ |

हे महिला विद्यापीठ असल्याने येथे तक्रार निवारण समित्यांची गरज नाही, असे कदाचित वाटू शकते, परंतु तक्रार कोणाकडूनही होऊ शकते. एखादी स्त्रीदेखील दुसरीचा लैंगिक छळ करू शकते. अशा प्रकारच्या तक्रारीविषयीही कायद्यात तरतूद आहे. एखाद्या पुरुष कर्मचाऱ्याविरोधात तक्रार येऊ शकते.

**डॉ. मंजूषा मोळवणे**
**सदस्य सचिव, राज्य महिला आयोग**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

येथील कार्यक्रमाला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे, आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रदीप जबडे, नलिनी चोपडे, ॲड. अर्चना गोंधळेकर,

**'पुश'चा पहिला टप्पा महाविद्यालय आणि उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थिनींसाठी होता. दुसरा टप्पा शासकीय कार्यालयांमध्ये राबविण्यात आला. या अंतर्गत राज्यभरातील विविध महसुली विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी जाऊन तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या टप्प्याचे तपशील खालीलप्रमाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| नागपूर विभाग | विभागीय आयुक्त कार्यालय | नागपूर | ६०० |
| औरंगाबाद विभाग | विभागीय आयुक्त कार्यालय | औरंगाबाद | ४५० |
| अमरावती विभाग | | जळगाव | ४०० |
| नागपूर विभाग | विभागीय आयुक्त कार्यालय | नागपूर | ६०० |
| पुणे विभाग | | पुणे व नाशिक | ७०० |

प्रशिक्षक विशाल केडिया, विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. झबडे आदी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| विद्यापीठातील एकूण कॉलेजे | ३८३ |
| कार्यक्रमातील सहभागी | ८१० |
| विद्यापीठातील विद्यार्थिनी | २, ११, २९२ |



रत्नागिरी येथे झालेल्या 'पुश' कार्यक्रमात बोलताना आयोगाच्या सदस्या आशा लांडगे.

## 'पुश'मध्ये नेमके काय केले जाते?

- 'पुश' उपक्रमांतर्गत राज्य महिला आयोग राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था, शाळा, उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था, सरकारी कार्यालये, तसेच हॉस्पिटल, कंपन्या यासारख्या कॉर्पोरेट क्षेत्रापर्यंत पोहोचत आहे. सुरुवात उच्च शिक्षण संस्थांपासून करण्यात आली आहे.
- 'पुश' उपक्रमांतर्गत १,००, ००० महिला, विद्यार्थिनींपर्यंत लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा आणि अंतर्गत चौकशी समित्या यांची माहिती पोहोचवून जनजागृती करण्याचे आयोगाचे उद्दिष्ट आहे.
- त्यासाठी आयोगाने १५०० आयसीसी प्रशिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे. हे प्रशिक्षत प्रशिक्षक इतरत्र जाऊन तक्रार निवारण कसे करावे, त्याचबरोबर कायद्याविषयी आणि लैंगिक छळाविरोधात जनजागृती घडवत आहेत.



औरंगाबादमध्ये झालेल्या 'पुश' कार्यक्रमात बोलताना अध्यक्षा विजया रहाटकर आणि विभागीय आयुक्त पुरुषोत्तम भापकर.

## तोंडओळख कायद्याची

# कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५

**हा कायदा हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करतो.तसेच पुरुषांच्या विरोधात नसून मानवतावाद, कायदा, नैतिकता आणि न्याय यांच्याशी विसंगत वर्तन करणाऱ्या व्यक्तींविरोधात आहे. या कायद्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष आहे.**

| कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? | |
|---|---|
| शारीरिक छळ | मारणे, चावणे, लाथाडणे, ठोसे मारणे, ढकलणे, शारीरिक अत्याचार इत्यादी. |
| शाब्दिक किंवा भावनिक छळ | अपमानास्पद उपहासात्मक बोलणे, नावे ठेवणे, नोकरीस प्रतिबंध इत्यादी. |
| आर्थिक छळ | घरगुती गरजांसाठी पैसे, भाडे, हातखर्च इत्यादी न देणे, पगार, उत्पन्न जबरदस्तीने घेणे इत्यादी. |
| लैंगिक छळ | जबरदस्तीने संभोग करणे, अश्लील चित्रफीत दाखवणे, बाल लैंगिक शोषण करणे इत्यादी. |
| **कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत स्त्रियांना मिळणारे आदेश** | |
| कलम १४ | अन्वये संयुक्त समुपदेशन/समझोते या कायद्याच्या अंतगर्त उपलब्ध आहेत. |
| कलम १८ | अन्वये संरक्षण आदेश कोणत्याही प्रकारची घरगुती हिंसा न करणे कामाच्या ठिकाणी प्रवेश न करणे, संपत्ती न विकणे. |
| कलम १९ | अन्वये निवासाचा आदेश स्त्रियांना घराबाहेर काढणे किंवा त्यांना घरात राहण्यास अडथळा आणणे. |
| कलम २० | अन्वये पोटगीचा आथिर्क आदेश राहणीमानाच्या दृष्टीने पुरेशी उचित, योग्य व वाजवी आथिर्क लाभाची रक्कम. |
| कलम २१ | मुलांच्या ताब्याचा आदेश. |
| कलम २२ | अन्वये नुकसान भरपाई आदेश. व्यथित व्यक्तीला झालेली ईजा,मानसिक छळ व भावनिक क्लेश यासाठी नुकसान भरपाई. |

# गावकारभारीण – एक अनुभव

**महिला राजसत्ता आंदोलन ही स्वयंसेवी संस्था गेली १८ वर्षे महिलांना प्रत्यक्ष सत्तेतील वाटा मिळवून देण्यासाठी काम करीत आहे. नव्याने निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना कारभाराची माहिती करून देण्यापासून ते त्यांना निर्णयक्षम बनविण्यापर्यंतचे काम संस्था करते. या संस्थेविषयी...**



**भीम रासकर**
राज्य समिती सदस्य, महिला राजसत्ता आंदोलन

गावातल्या शाळेत चौथीत असताना एका गुंडाचा तमाशा आम्ही सर्वजण उघड्या डोळ्यांनी पाहायचो. पाणी आणायला जाणारी बाई असो की शौचाला जाणारी, गावाने पोसलेला हा गुंड तिचा पाठलाग करायचा. त्यानं बायांचा जीव नको करून टाकला होता.

एके दिवशी पाटलानं, तालुक्यावरून आणून दुसऱ्या घरात ठेवलेली केसरबाई या गुंडाला भेटली. तिनं भर रस्त्यात त्याला आडवा केला. साऱ्या बाया गोळा झाल्या. आम्ही पोरं-टोरं तर टाळ्या पिटायचेच बाकी होतो. तिनं रस्त्यावर आडवा पडेपर्यंत त्याला बुकलला! शेजारी कुत्र्याची घाण पडली होती त्याच्यातच त्याला धुमसवला! सारा गाव अवाक् झाला. ती पाटलीण नसली तरी पाटलानं ठेवलेली बाई! कोण तिला हात लावणार? आठवड्यात गावातलं तंग वातावरण निवळलं!

ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले. गावातला खराखुरा गाव हलायला लागला. तेवढ्यात बातमी धडकली, एक बाई उमेदवार म्हणून हवी आहे. गावकरी बाई शोधून-शोधून थकले. पिंपळाच्या पारावर सहज कुणी तरी केसरबाईच नाव घेतलं. पाटलानंही ते मनावर घेतलं. बाई

तयारच होत्या. हा हा म्हणता प्रचार सुरू झाला, आणि त्या जिंकल्यादेखील! बाईंची बैलगाडीतून विजयी मिरवणूक काढली गेली. गुंडाला एका दमात आडवा करणारी केसरबाई, बायांच्या दमावर निवडणूक जिंकली!

शाळेत पाण्याची टाकी नाही म्हणून आमच्या वर्गातल्या मुली केसरबाईंना भेटल्या. मधल्या सुटीत रोज दारोदारी पाणी मागायचा पोरींनाच काय, आम्हालाही वैताग आला होता. केसरबाईंनी ग्रामपंचायतीत धोशा लावून महिन्यात शाळेत पाण्याची टाकी बसवून घेतली!

आमच्या मतानं, केसरबाई आमची हिरॉइन झाली. आम्ही जमेल तेव्हा तिच्याशी गप्पा मारायचो. एकदम सरळ कारभार! माझ्या आयुष्यात मी पाहिलेली ही पहिली यशस्वी कारभारीण! आम्हाला शाळेत केवळ पाणी देणारी नाही तर गुंडाला चितपट करून लोळवणारी ही केसरबाई, बालमनावर छाप सोडून न जाती तरच नवल!

पुढच्या वाटचालीत रिसोर्स अँड सपोर्ट सेंटरच्या (आर.एस.सी.डी.) 'परिणाममापनाचं' काम आमच्या टीमला मिळालं! १९९४ सालापासून महाराष्ट्राच्या विभागा-विभागांतून लोकविकासमंच तयार झाले होते. अनेक संस्था-संघटनांचा हा समुदाय परिणामकारकरीत्या काम करीत होता; परंतु राज्य पातळीवर आणि विशेषतः धोरणावर त्याचा परिणाम जाणवत नव्हता. सर्व लोकविकासमंचाच्या राज्यस्तरीय टीमने सामूहिक 'राज्य अभियान' राबवायचं ठरवलं. त्यात बचतगटाच्या महिला या सर्व विभागांत समान घटक असल्याचं जाणवलं. पंचायतराज व महिला आरक्षण हा मुद्दा त्यातून चर्चेला आला. राज्याच्या पहिल्या महिला धोरणाचाही प्रभाव आमच्यावर होताच. त्यातूनच 'महिला राजसत्ता आंदोलन' आकार घेत गेलं! महाराष्ट्रातल्या १६२ संस्था-संघटनांचं जाळं पाच विभागीय नेटवर्कमार्फत जिल्ह्याजिल्ह्यांत पोहोचलं. दोन वर्षांत अनेक कार्यशाळा व विचारमंथनानंतर 'सायगाटा अधिवेशन-२०००' पार पडलं. विदर्भातल्या या छोट्या गावात महाराष्ट्रभरच्या बचतगट व पंचायत-कारभारणी दोन दिवस ठाण मांडून बसल्या. आपलं नाव, गावं, मागण्या, अनुभव सांगत त्यांनीच या अभियानाची घोषणाही केली. सन २००० ते निवडणूक आयोगाच्या पुढाकारातली २०१७ची राष्ट्रीय परिषद ही महिला राजसत्तेच्या प्रवासाची म्हणजे एक सोनेरी इतिहास व भविष्यकाळाची भक्कम पायाभरणीचा टप्पा मानला पाहिजे.

'प्रकल्प' ही संकल्पना काही संघटना व महिलांनी मोडीत काढत, 'पंचायतराजमध्ये नेतृत्वात महिला' हे अभियान उभारलं गेलं. आज बारा हजार सदस्य, सहाशे गाव-शाखा, दोन हजार कारभारणींची पंचायतराज आघाडी, शंभर नेतृत्वशील महिलांची टीम, जोतिबांच्या विचारांची, संस्थाप्रमुखांची साथ, अनेक नेटवर्कचे सहकार्य व गावासह महिलांचे प्रश्न घेऊन लढणारी ३५ प्रमुखांची अव्वल फळी महाराष्ट्रात उभी राहिली! बेचाळीस भागीदार, अनेक नामवंत, विचारवंत व महिला चळवळीच्या प्रेरणेचं बळ लाभलेलं हे आंदोलन गावागावांत रुजत आहे.

निवडणूक आणि लोकप्रश्न यांची फारकत कशी झाली कुणास ठाऊक? पंचायतराज व गावसमस्या यांचाही घटस्फोट कुणी, कसा घडवून आणला हाही शोधनिबंधाचा विषय होऊ शकतो; परंतु सर्वांत मोठा शोध पुढे येतोय तो म्हणजे- माणसाला राजकारणाचा तिटकारा वाटावा अशी अवस्था, कोणत्या व्यवस्थेनं जन्माला घातली आणि का घातली? या सर्व प्रश्नांच्या शोधात महिला राजसत्ता आंदोलन गेली १८ वर्षं महिलांच्या पाठबळावर, त्यांच्या ऊर्जेवर व नेतृत्वशील राजकारणांच्या अनुभवावर उभं राहिलं आहे.

सायगाटाला रणशिंग फुंकलं, संगमनेर अधिवेशनात ग्रामसभा गौरव अभियानाची घोषणा झाली. औरंगाबादला सहकारी आंदोलनाशी आघाडी बनवायचं ठरलं. मुंबईतल्या जागतिक सामाजिक मंचानं विश्व-व्यासपीठावर महिलांना पाचारण केलं. पुण्यात झालेल्या भेटीत अमेरिका आणि बांगला देशातल्या पाहुण्यांसोबतचा वडगाव-झांजे'तला संवाद महिलांना मांडणी करण्याचं आत्मभान देऊन गेला. गारगोटीत नव्या दमाच्या कारभारणींनी आंदोलनाची धुरा आपण सांभाळू शकतो हे सप्रमाण सिद्ध केलं. मुंबईत झालेल्या महिलांच्या विविध प्रश्नांवरील महिला महापंचायतीतील आंदोलनाची भागीदारी डोळ्यात भरण्याजोगी होती. नायगाव भेटीतील महिला सरपंचांचे जोतिबा-सावित्री दिनदर्शिका वाचन, वेगळा अनुभव सांगून गेले! २०१७च्या रौप्य महोत्सवी राष्ट्रीय परिषदेत कारभारणीची सापशिडी व 'ओरिएंटेशन पॉलिसी' चांगली दुमदुमली.

दर वार्षिकात होणारी महिला अत्याचारविरोधी धरणे आंदोलनं असोत, राजसत्तेतल्या कारभारणी हा विशेषांक

असो, सरोजिनी नायडू पुरस्काराची लेखनमाला असो किंवा दर त्रैमासिकात होणारा राज्य आढावा असो, या नेतृत्वशील महिलांची मुसंडी आता. दिल्ली, आसाम, नेपाळ, जयपूर, कच्छ व अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरांपर्यंत पोहचली आहे.

यातल्या काही कारभारणींचा कारभार हा वर्तमानपत्रं, मासिकं व दूरदर्शनपर्यंत पोहोचला आहे. अनेकींना त्यांच्या गावातल्या पंचायतींसोबत आजही तीव्र झगडा करावा लागत आहे. कारभारणींच्या तोंडून सहज बाहेर पडणारी रणनीती जगभर पोहोचवण्याची गरज आहे. त्यांनीच 'ग्रामपंचायत दर्शन' हे अभियान राबवून बायांना ग्रमापंचायतीचा उंबरठा ओलांडायला शिकवलं. त्यांनीच 'हिशेब दाखवा' अभियान घेऊन गावातल्या सत्ताकेंद्रांना जाब विचारला. त्यांनीच आम्हाला वेगळ्या सभा घेऊ द्या, म्हणून 'महिला ग्रामसभा' मिळवली आणि 'झेंडावंदनाचा अन्याय'ही दूर केला. आज त्या दिमाखात झेंडावंदन करायला जातात व सोबत बायांनाही घेऊन जातात. महिला सरपंचांबरोबर त्यांच्या नवऱ्यांचाही जाहीर सत्कार करा, हेही या कारभारणीच सांगतात. एकदा बाईच्या कामात लुडबुडणार नाही हे जाहीर कबूल केले की गाव आपोआपच नवऱ्याला ताळ्यावर ठेवतं. जोतिबा जागृती अभियानालाही कारभारणींचा पाठिंबा आता जास्त समजूतदारपणे वाढला आहे. 'सावित्री दिसे घरोघरी, जोतिबाचा शोध जारी' या मोहिमेचा प्रचार राज्यभर सुरू आहे. महाराष्ट्रानं पंचायतीत महिलांना निम्मं आरक्षण दिलं तसं किमान ३३ टक्के आरक्षण वरील सभागृहात मिळालं तर, आत्ता फौज तयार आहे.

महिलांच्या पुढाकाराने व्यापक राजकारणाची दिशा व दशा बदलण्याच्या इराद्याने पंचायतराज व प्रश्नांची गाठ घालत महिला राजसत्ता आंदोलन, एक राज्यव्यापी जनसंघटना म्हणून बाळसं धरीत आहे. सभोवतालच्या चार राज्यांसोबत विचार-विनिमय करीत, राष्ट्रीय स्तरावरही अनुभव मांडत आहे. ही संघटना पुरुषविरोध नाही. जोतिबा आघाडी, संस्था-आघाडी, पंचायतराज आघाडी व युवा-आघाडीची बांधणी केली जाणार आहे. काही जिह्यांमधून असंघटित महिलाही आंदोलनाशी 'मोलकरीण' संघटनेच्या माध्यमातून सोबत येत आहेत. 'लॉग इन एशिया' या तेरा देशांच्या नेटवर्कशी आपला नित्य संबंध आहे.

पुढील काळात राजसत्तेतील महिलांच्या प्रश्नांसोबत गावाचेही प्रश्न जसे - महिलांबाबतची हिंसा, दारू व



उपजीविकेचे व नव्यानं तयार होणारे असुरक्षिततेचे प्रश्न, घेतच हे जनआंदोलन व्हावे, असा ध्यास आहे. गावातल्या राजकारणापासून जिल्हा परिषदेच्या सभापतिपदापर्यंत महिला ठसा उमटवीत आहेत. बचतगटातील पारदर्शिता, उत्तरदायित्व व लोकशाही गावातल्या पंचायतींत मूळ धरत आहे. ही लोकशाही लोकसभेपर्यंत पोहोचवायची तर प्रवास खडतर असला तरी राज्य घटनेच्या मार्गानं जाणारा असल्याने दिशा स्पष्ट आहे. प्रत्येकाची राजकारणाची गोडी वाढल्याशिवाय त्या मार्गावरील अंधुकपणा दूर होणार नाही. साऱ्या नद्या जशा समुद्रात मिळतात तसे सारे प्रश्न राजकारण या समुद्राशी येऊन भिडतात. त्यासाठी 'राजकारण' या संकल्पनेची प्रतिष्ठा योग्य उंचीवर गेली पाहिजे. आपल्या हातात मोबाइल आला आणि तो वापरायला आपण सहजगत्या शिकलो. मात्र महिला आरक्षणाचं साधन, अजून सत्ताधारीवर्ग समजून घ्यायला शिकला नाही. त्याकडे तो शंकेनेच पाहतोय. नाही तर राज्यातलं आणि देशातलं महिला आरक्षण विधेयक का अडकलं असतं?

(**संपर्क :** द्वारा आर.एस.सी.डी., सेक्टर ९, आर एच ४, सी ४, लेन ४, सी.बी.डी-बेलापूर, नवी मुंबई ४००६१४. मोबाईलः ९८६९२५९१९४
ई-मेल : bhim.rscdgmail.com)

# पोलिसांकडून मदत कशी मिळवावी...

- महिलांनी त्यांच्याविरुद्ध होत असलेल्या गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी न घाबरता पोलीस ठाण्यास जावे.
- पोलीस ठाण्यात महिला अधिकारी तत्काळ दखल घेऊन तक्रार नोंदवून घेतील.
- तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरित विनामूल्य दिली जाईल.
- विनयभंग, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे घटनास्थळ कोठे आहे याची काळजी करू नका. कोणत्याही पोलीस ठाण्यात जा. पोलीस तुमची तक्रार नोंदवून संबंधित पोलीस ठाण्यास त्वरित हस्तांतरित करतील.
- तुमचा जबाब नोंदवताना तुमच्यासोबत तुमची विश्वासाई व्यक्ती हजर राहू शकतील. तुम्ही कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी असाल तर पोलीस तुमची तक्रार नोंदवून घेतील. त्याचबरोबर तुम्हाला कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत जिल्हास्तरावरील महिला बाल विकास अधिकारी, या कार्यालयामार्फत सेवा उपलब्ध होऊ शकते याची माहिती देतील.
- महिला जर लैंगिक गुन्ह्याच्या बळी असेल तर महिलांच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्ती पोलीस ठाण्यास येऊन तक्रार देऊ शकते.
- महिला जर पोलीस ठाण्यास जाऊ इच्छित नसेल तर पोलिसांच्या मुंबई येथील १०३ व उर्वरित महाराष्ट्रकरिता १०९१ या हेल्पलाईनवर संपर्क साधा. महिला पोलीस अधिकारी साध्या वेशात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्याद/जबाब नोंदवतील.
- महिला जर स्थानिक भाषेत बोलू शकत नसेल किंवा काही शारीरिक/मानसिक व्यंग असेल तर पोलीस दुभाष्या किंवा विशेष प्रशिक्षक बोलून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद/जबाब नोंदवून घेतील.
- महिला पोलीस ठाण्यात आल्यावर आरोपीच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता पोलीस घेतील.



- पोलीस तुम्हाला गरजेनुसार वैद्यकीय उपचार/तपासणीसाठी रुग्णालयात घेऊन जातील व महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेतील.
- जर तुम्हाला आश्रय/निवारा हवा असेल तर तोही मिळवून देण्यास पोलिस सहकार्य करतील.
- महिला पोलीस अधिकारी पोलीस ठाण्यामध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये महिलेस बोलविता येत नाही.
- महिला सायबर गुन्ह्याबाबत सायबर सेलशी संपर्क साधू शकतात.
- एखाद्या महिलेला अटक करताना महिला पोलीस व महिला साक्षीदार असतात.
- महिला त्यांच्याप्रकरणी जिल्हास्तरावर पोलिस अधीक्षक/आयुक्त कार्यालयातील महिला व मुलांकरिता सहायता कक्ष यांच्याकडे मदत मागू शकतात.
- विनयभंग, लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हे अशा अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांची ओळख ही गोपनीय ठेवण्यात येईल.



# कुटुंबाचे आर्थिक व्यवहारही समजून घ्या

**सज्ञान असलेल्या प्रत्येक मुलीला, बाईला आपले उत्पन्न कसे सांभाळायचे, हे समजलेच पाहिजे. त्या शिवाय आपल्या कुटुंबाचे उत्पन्न कसे सांभाळले जात आहे, हेही नीट माहीत हवे.**




सीए अजित जोशी

meeajitgmail.com


सुलेखा एक प्रसिद्ध आर्किटेक्ट होत्या. अनेक थोरामोठ्यांचे बंगले, मोठ्या मोठ्या इमारती त्यांनी घडवलेल्या होत्या. माझ्या एका क्लायंटने सांगितलं, म्हणून त्या दोन-तीन वर्षांपूर्वी मला भेटायला आल्या. त्यांना गेल्या तीन वर्षांचे प्राप्तिकराचे हिशेब सरकारला द्यायचे होते. इतके भरपूर उत्पन्न असताना तुम्ही प्राप्तिकराचे हिशेब का बरं थकवले, हे मी त्यांना विचारले. तेव्हा त्यांनी अगदी प्रांजळपणे सागितले की 'ते सगळं' त्यांचा नवराच पाहात असे, पण त्याच्याशी जमत नाहीसं झालं, तेव्हा त्याने अंग काढून घेतलं आणि विषय आता घटस्फोटापर्यंत आला आहे. आता त्यांना हे हिशेब देण्याची गरज वाटत होती. जसजसे त्यांचे व्यवहार पाहत गेलो, तसतसे लक्षात आले, की लग्नाच्या पहिल्या जवळजवळ आठ वर्षात नवऱ्याने या बाईंचे उत्पन्न हवे तसे फिरवले होते. त्यातून शेअर्स, एफडी एवढेच काय, एका घरातही गुंतवणूक केलेली होती, पण ती सगळी गुंतवणूक स्वतःच्या नावाने केली होती. ते पैसे आपले आहेत, हेही सुलेखाला माहीत नव्हते आणि आता ते सिद्ध करणे तर आणखीच कठीण असणार

होते.

ह्या घटनेने मला धक्काही बसला आणि माझे डोळेही उघडले. धक्का याकरता की एका उच्चशिक्षित, व्यावसायिक, स्वतंत्र बाण्याच्या स्त्रीलाही स्वतः कमावलेल्या रकमेचाही हिशेब ठेवला पाहिजे याची जाणीव नव्हती, आणि डोळे उघडले, ते एका संपूर्ण नव्या विषयाकडे, तो म्हणजे स्त्रियांमधली अर्थसाक्षरता आणि स्त्री सक्षमीकरणाची चळवळ. स्त्रीला एक व्यक्ती म्हणून तिचे हक्क, ओळख, सन्मान देताना अनेक गोष्टींवर भर दिला जातो. तिच्यासोबत हिंसाचार होऊ नये, मालमत्तेत तिचे अधिकार राहावे, तिचा शारीरिक अगर मानसिक छळ करू नये, तिला स्वसंरक्षण करता यावे, वगैरे; पण या सगळ्याबरोबरच तिला तिचे आणि तिच्या परिवाराचे उत्पन्न काय आहे आणि त्याचा विनियोग कसा होतो, याची व्यवस्थित माहितीही असायला हवी. या विषयी जनजागृती करणारी कोणतीच चळवळ आपल्याला दिसत नाही. कदाचित एकूणच भारतीय समाजात असलेली पैशांविषयीच्या साक्षरतेची उदासीनता हे त्याचे कारण असावे. लक्ष्मीमातेला पुजून एकदा देव्हाऱ्यात हळदीकुंकू वाहिले की त्यानंतर प्रत्यक्ष जीवनात तिचे स्मरण ठेवायला पाहिजे, याचे भान आपल्या समाजात शिकल्या सवरलेल्यांनाही नाही, तिथे ज्यांच्यापर्यंत काहीच अधिकृत ज्ञान नीट पोहोचत नाही, अशा इतरांची काय कथा?

मात्र ही परिस्थिती बदलायला हवी. सज्ञान असलेल्या प्रत्येक मुलीला, बाईला आपले उत्पन्न कसे सांभाळायचे, हे समजलेच पाहिजे. त्या शिवाय आपल्या कुटुंबाचे उत्पन्न कसे सांभाळले जात आहे, हेही नीट माहीत हवे. कोणत्या बँकेत खाती आहेत? ती एकट्याच्या नावावर आहेत का दोघांच्या? नवरा/वडील गुंतवणूक कुठे करतात? त्या गुंतवणुकीचा फायदा होतो आहे का? त्या गुंतवणुकीवर कोणाचे नाव येते? नॉमिनेशन केले का? कोणाच्या नावाने? गुंतवणुकीत नको ते धोके पत्करून नवरा/बाप त्यांची स्वतःची अगर आपली मेहनतीची कमाई वाया तर घालवत नाही ना? योग्य ती कायदेशीर काळजी घेऊनच गुंतवणूक होते ना? या सगळ्या गोष्टींची माहिती ठेवणे, हे गरजेचे आहे तसेच त्यातल्या निर्णयप्रक्रियेत सहभागी





होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या सगळ्यातूनच तिला घराच्या सगळ्या कारभाराचे आकलन येते. सासरचे आणि नवराच काय पण मोठी झाल्यावर मुलेही तिची सहजासहजी उपेक्षा करू शकत नाहीत. तिच्या मताला किंमत येते. घरच्या पुरुषाला आदर वाटतो. योग्य ते ज्ञान आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग यातून सक्षमीकरण घडते आणि आत्मसन्मान आपोआप मिळतो.

सुलेखाचा किस्सा मी दुसऱ्या एका मैत्रिणीला सांगितला, तर ती उसळून म्हणाली,'सगळ्यांचीच भांडणे काही घटस्फोटापर्यंत जातात असे नाही. उगीच वेगळे होण्याचीच तयारी करून संसार का करावा?'. ...हा गैरसमज आहे. आर्थिक व्यवहारांची माहिती मिळवणे म्हणजे काय लगेच भांडणं/घटस्फोट वगैरेची तयारी असावी, असे बिलकुल नाही. या बाबतीत माहिती घेणे, हा सहजीवनाचा एक भाग आहे. घरच्या पुरुषाचे ब्लड प्रेशर आणि शुगर लेव्हल माहीत असायला हवी, त्याने कोणते कपडे घातले की तो खुलून दिसतो, कोणती भाजी त्याला आवडते, कोणते नातेवाईक टाळायचे आणि कोणते बोलवायचे, हे सगळे आपल्याला ठाऊक असते की नाही? तसेच हे! किंबहुना लग्नानंतर दोनेक वर्षांनीही ही माहिती द्यायला पुरुष टाळाटाळ करत असेत, तर खुशाल समजा, की 'दाल में कुछ जरूर काला है'. ज्याच्या मनात कोणताही 'डर' नसेल, असा पुरुष बिनधास्त सहचारिणीला आपली आर्थिक माहिती आवर्जून देईल. त्यातून त्यांचे नातेही समृद्ध होईल आणि गुंतवणुकही आर्थिकदृष्ट्या फलद्रूप होईल.

हा शेवटचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. स्त्रीच्या सहभागामुळे गुंतवणुकीत फायदे वाढायची शक्यता आहे, अशी माझी आंतरिक धारणा आहे. कारण बहुतांश स्त्रियांमध्ये एक अंगभूत सावध निवडक्षमता असते. पटकन जुगार खेळण्याची त्यांची प्रवृत्ती नसते. वाहवत जाण्याची शक्यता त्यांच्याबाबत कमी असावी. या सगळ्या गोष्टी सांसारिक उत्पन्नाचे नियोजन करण्यास उपयुक्तच आहेत. याला काही शास्त्रीय आधार आहे की नाही, ते मला ठाऊक नाही, पण साधारण अनुभव असा नक्की आहे.

आणि म्हणून आपण भेटत राहू, सगळ्या काकूंनी / मावशांनी/तायांनी आणि मैत्रिणींनी पैशांच्या गोष्टी समजून घ्याव्या आणि शिकून घ्याव्या म्हणून....!

**(लेखक चार्टर्ड अकौंटंट असून, या विलेपार्ले, मुंबई येथील पीटीव्हीएज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये अध्यापन करतात.)**



## हेल्पलाइन

# अन्याय सहन करू नका, कायद्याची मदत घ्या

- महिला आयोग सदैव आपल्या पाठीशी आहे.
- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून प्रतिबंध/ मनाई/ निवारण कायदा, २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता आहे.
- कौटुंबिक हिंसाचार कायदा,२००५ अन्वये महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा हक्क/नुकसान भरपाई/पोटगी या कायद्यान्वये मागू शकतात.
- गर्भधारणापूव व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ या कायद्याने लिंग निवडीबाबत प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सायबर क्राईम अधिनियम २०१५ अन्वये अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करणे, महिती काढणे कायद्याने गुन्हा आहे.
- अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये महिलांची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे.
- लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (**POCSO**) अन्वये अल्पवयीन बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यात आला आहे.

## साद-प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

रौप्य महोत्सवी वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

# महिलांसाठी उपयुक्त केंद्रीय योजना

**महिलांच्या विकासासाठी राज्य आणि केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशील आहेत. राज्य सराकराच्या माध्यमातून महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती या अंकात आहेच, पण काही केंद्रीय योजनाही महिलांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. त्यांची ही ओळख.**



## साद प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील सरकार महिलांचा विकास, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी नेहमीच कटिबद्ध आहे. याच दृष्टीने केंद्राने नुकत्याच दोन महत्त्वाकांक्षी योजनांची घोषणा केली आहे. महिला सुरक्षा आणि सक्षमीकरण योजना आणि दुसरी म्हणजे, राष्ट्रीय आहार मिशन योजना. हिंसाचारमुक्त आणि समानतेच्या वातावरणात असलेली सशक्त स्त्री स्वतःच्या प्रगतीसह समाजाच्या, देशाच्या प्रगतीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते, हे लक्षात घेऊन आखलेल्या या योजना महिलांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. या योजनांची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे...

### महिला सुरक्षा आणि सक्षमीकरण योजना :

महिलांच्या सुरक्षेबरोबरच त्यांच्या क्षमतांना फुलविण्यासाठी केंद्राने ही नवी योजना आणली आहे. त्याशिवाय 'पंतप्रधान महिला शक्ती केंद्रे'ही सुरू केली जाणार आहेत. त्यासाठी पुढील दोन वर्षांमध्ये साडेतीन



हजार कोटींहून अधिक निधीची तरतूद केली जाईल. या योजनेचे भाग खालीलप्रमाणे :

### १. पंतप्रधान महिला शक्ती केंद्र

देशातील अतिशय मागास अशा ११५ जिल्ह्यांकरिता पंतप्रधान महिला शक्ती केंद्र (पीएमएमएसके) या नव्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. या केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली जाईल. प्रशिक्षण, सामाजिक सहभाग, एकत्रित विकास यातून ग्रामीण भागातील महिलांच्या सबलीकरणावर विशेष लक्ष दिल जाणार आहे. या सगळ्या प्रक्रियेत स्थानिक महाविद्यालयातील जवळपास ३ लाख विद्यार्थ्यांची परिवर्तन स्वयंसेवक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. एनएसएस, एनसीसीच्या विद्यार्थ्यांना ही यात सहभागी करून घेतले जाईल. या स्वयंसेवकांच्या कामाचे मूल्यांकन डिजिटली होऊन त्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल. हे विद्यार्थी परिवर्तनाचे दूत म्हणून काम करतील.




### २. ‘बेटी बचाओ...’चा देशव्यापी विस्तार

‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’चा विस्तार करून देशातील सर्व ६४० जिल्ह्यात ही योजना नेण्यात येईल. मुलींच्या जन्मदराबाबत पिछाडीवर असलेल्या जिल्ह्यांतून त्याची सुरुवात होईल.

### ३. ‘वन स्टॉप सेंटर’

अत्याचारपीडित महिलांसाठी १५० पेक्षा जिल्ह्यांत जास्त ‘वन स्टॉप सेंटर’ (ओएससी) सुरू करण्यात येणार आहेत. एक खिडकी सेवा या संकल्पनेत तयार होणाऱ्या या सेंटरकडून महिलांना वैद्यकीय मदत, पोलिसांचे सहाय्य, कायदेशीर मदत, समुपदेशन आणि सोबतच तात्पुरता निवाऱ्याची सोय होईल.




### ४. महिलांसाठी हेल्पलाइन

देशातल्या २८ राज्यांत आणि केंद्राशासित प्रदेशात २४ तास कार्यरत असलेली अशी १८१ क्रमांकाची हेल्पलाइन अडचणीतल्या महिलेला उपयोगी ठरते आहे. सार्वजनिक ठिकाणी तसेच कौटुंबिक हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांसाठी २४ तास कार्यरत अशी ही हेल्पलाइन आपत्कालीन वेळेत उपयोगी ठरेल.

### ५. महिला पोलिस स्वयंससेवक

विविध राज्यांतील ६५ जिल्ह्यांत महिला पोलिस स्वयंसेवकांना समाजाशी जोडले जाईल. यातून सामान्य जनता आणि पोलिसांमधील समन्वय निर्माण करून सुसंवाद वाढवण्यावर भर दिला जाईल.

### ६. नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे

नोकरदार महिलांना शहरात सामोरे जावे लागणाऱ्या समस्या लक्षात घेऊन १९० वसतिगृहे बांधण्याचा ही निर्णय घेण्यात आला आहे. १९ हजार महिलांच्या निवासाची व्यवस्था यातून होणार आहे.

### ७. स्वाधारगृहे

परितक्त्यांसाठी नव्या २०८ स्वाधारगृहांना मान्यता देण्यात आली आहे. बलात्कार, अत्याचारपीडितांनाही यात सामावून घेतले जाणार आहे. २६,००० लाभार्थ्यांना सामावून घेणाऱ्या या स्वाधारगृहांच्या माध्यमातून मदत आणि पुनवर्सन याकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे.

### राष्ट्रीय आहार मिशन (एनएनएम)

अर्भकांमधील कुपोषण आणि खुरटणाऱ्या वाढीचे प्रमाण ३८.४ टक्क्यांवरून २०२२पर्यंत थेट २५ टक्क्यांपर्यंत कमी आणण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट असणारी राष्ट्रीय आहार मिशन योजना आखण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यांत १६२ मागास जिल्ह्यांम धील ४२ लाख बालकांवर लक्ष केंद्रीत केल्या या योजनेसाठी तब्बल ९००० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. अर्भक, गर्भवती महिला आणि युवती यांच्याम धील रक्तक्षयाचे (अनिमिया) प्रमाण तीन टक्क्यांनी करण्याचेही या योजनेचे उद्दिष्ट आहे.

### याशिवाय, केंद्र सरकारच्या आणखी चार महत्त्वाच्या योजना महिलांसाठी उपयुक्त ठरत आहेत.




### १. मुद्रा

२०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये १ लाख ८० हजार कोटी रुपयांचे कर्ज वाटप. त्यापैकी ७० टक्के कर्जवाटप महिलांसाठी. म्हणजे सुमारे सव्वा लाख कोटी रुपयांचे कर्जवाटप महिलांना करण्यात आले आहे. त्यातही इतर मागासवर्गीय, आदिवासी, दलित व मुस्लिम महिलांचे प्रमाण लक्षणीय असून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठा हातभार लागत आहे.

### २. पंतप्रधान उज्ज्वला योजना

गेल्या दीड वर्षांमध्ये तब्बल ३ कोटी २० लाख गॅस सिलिंडरचे गरीब महिलांना मोफत वितरण करण्यात आले आहे. प्रदूषित इंधनांचा वापर करून चुलीवर स्वयंपाक करणे म्हणजे एका तासाला तब्बल चारशे सिगारेटचे सेवन करण्याइतके हानीकारक असते. हे लक्षात घेतल्यास गॅस सिलिंडर्समुळे भयावह प्रदूषणापासून महिलांची मुक्तता होईल. ही योजना अत्यंत लोकप्रिय ठरली असून ती गोरगरीब महिलांच्या आरोग्याचे कवचकुंडल बनली आहे.

### ३. मातृत्व लाभ योजना

गरीब, असंघटित आणि हातावरचे पोट असलेल्या गर्भवती महिलांना प्रथम अपत्यासाठी सहा हजार रुपयांचा थेट लाभ (रोख रक्कम) देणारी ही योजना. ही रक्कम तीन टप्प्यांत मिळेल. येत्या तीन वर्षांमध्ये या योजनेसाठी १२,६६० रूपयांचा खर्च येईल आणि सुमारे ५२ लाख गर्भवतींना त्याचा फायदा होईल.

### ४. तिहेरी तलाकविरुद्ध कायदा

मुस्लिम महिलांच्या असहायतेचा फायदा घेऊन त्यांचे शोषण करणारया तिहेरी तलाक या कुप्रथेविरुद्ध केंद्राने तयार केलेला कडक कायदा ही मोदी सरकारची मोठी उपलब्धी आहे. आजपर्यंतच्या सरकारांनी लांगूनचालनाची परंपरा चालू ठेवत मुस्लिम महिलांच्या अन्यायाकडे दुर्लक्ष केले होते. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मोदी सरकारने अतिशय कडक विधेयक बनवले आहे. त्यानुसार कोणत्याही प्रकारे दिलेला (तोंडी, लेखी, एसएमएस-ईमेल-व्हॅटसअद्वारे) तिहेरी तलाक दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा असेल. त्यासाठी कमाल तीन वर्षांच्या तुरूंगवासाची शिक्षा प्रस्तावित आहे. संसदेची लवकरच मंजुरी मिळेल. कायदा अस्तित्वात आल्यानंतर मुस्लिम महिलांवरील अन्याय व त्यांच्या शोषणास आळा बसण्याची पूर्ण खात्री आहे.

# न्याय मिळाला... संसार वाचले

**राज्य महिला आयोगाच्या वतीने आयोग आपल्या दारी ही मोहीम नुकतीच राज्यभर राबविण्यात आली. या उपक्रमाचा आढावा...**



## साद प्रतिनिधी

राज्य महिला आयोगाच्या वतीने आयोग आपल्या दारी ही मोहीम नुकतीच राज्यभर राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत आयोगाकडे आधीच दाखल असलेल्या तसेच, नव्याने दाखल करण्यात आलेल्या तक्रारींची सुनावणी विविध विभागीय कार्यालये तसेच शहरांमध्ये जाऊन करण्यात आली. पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १६० तक्रारींवर या मोहिमेत सुनावणी घेण्यात आली. आयोग केवळ महिलांना न्याय मिळवून देण्याचेच काम करतो, असे नाही, तर त्यांचे संसार जोडण्याचे, ते वाचविण्याचेही काम करतो. आयोग आपल्या दारी या मोहिमेत नऊ जोडप्यांचे संसार वाचविण्यात आयोगाला यश मिळाले. आजकालचे घटस्फोटांचे वाढते प्रमाण लक्षात घेता हे यश उल्लेखनीय असेच म्हणावे लागेल.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील ५० तक्रारींची सुनावणी पूर्ण विभक्त होण्याच्या मार्गावर असलेली ५ जोडपी पुन्हा संसारात रमली.

रत्नागिरी : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी

'महिला आयोग आपल्या दारी' अंतर्गत ०७.०९.२०१७ रोजी रत्नागिरी येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी आयोगाकडे दाखल असलेल्या १५ तसेच ३५ नव्या तक्रारी अशा एकूण ५० तक्रारीवर सुनावणी घेण्यात आली. महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, वकील, पोलीस अधिकारी,



समुपदेशक, महिला बाल विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यातील दाखल तक्रारींची सुनावणी, समुपदेशन प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

विभक्त होण्याचा निर्णय घेतलेल्या जोडप्यांचे समुपदेशन यावेळी करण्यात आले. यातील ५ जोडपी पुन्हा एकमताने संसारात रमली आहेत. इतर तक्रारींमध्ये संबंधित यंत्रणांना नोटीस बजावून ३० दिवसांत कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

या वेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या, आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत अनेक महिला पुढे येऊन तक्रारी करत आहेत. सर्व यंत्रणा सुनावणीला उपस्थित असल्याने कारवाई वेगाने होऊन तक्रारी निकाली काढण्यास मदत होत आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांतील ६० तक्रारींची जनसुनावणी.

## चार जोडप्यांचे संसार बचावले

कोल्हापूर - महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी 'महिलाआयोग आपल्या दारी' अंतर्गत १९.०८.२०१७ रोजी कोल्हापूर येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी आयोगाकडे दाखल असलेल्या ३५ तसेच २५ नव्या तक्रारी अशा एकूण ६० तक्रारीवर सुनावणी घेण्यात आली.

महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, वकील, पोलीस अधिकारी, समुपदेशक, महिला बाल विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यातील दाखल तक्रारींची सुनावणी, समुपदेशन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. विभक्त होण्याचा निर्णय घेतलेल्या जोडप्यांचे समुपदेशन यावेळी करण्यात आले. यातील ४ जोडपी पुन्हा एकमताने संसारात रमली आहेत.

## पुणे जिल्ह्यातील ५० तक्रारींची सुनावणी पूर्ण

फेब्रुवारी २०१६ पासूनच्या सर्व तक्रारींचे निवारण

पुणे : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी 'म हिलाआयोग आपल्या दारी' अंतर्गत २२.०८.२०१७ रोजी पुणे येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी आयोगाकडे दाखल असलेल्या २४ तसेच २६ नव्या तक्रारी अशा एकूण ५० तक्रारीवर सुनावणी घेण्यात आली. महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, वकील, पोलीस अधिकारी, समुपदेशक,महिला बाल विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत पुणे, पिंपरी चिंचवड मधील दाखल तक्रारींची सुनावणी, समुपदेशन प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

पुणे विभागात कोल्हापूर आणि पुणे अशा दोन ठिकाणी स्वतंत्र सुनावणी,समुपदेशन करून महिला आयोगाने अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतरच्या सर्व तक्रारींवर कार्यवाही केली आहे.

पुणे विभागातील फेब्रुवारी २०१६ पासून दाखल सर्व तक्रारींवर सुनावणी पूर्ण झाली आहे. या बाबत आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या, महिला आयोग आपल्या दारी सारख्या उपक्रमामुळे महिलांना त्यांच्या दारीच न्याय मिळत आहे. आणि त्यामुळेच सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यातील फेब्रुवारी २०१६ पासूनच्या तक्रारींबाबत 'झिरो पेंडन्सी' झाली आहे.

# लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, २०13

**लैंगिक छळामध्ये अनेक बाबींचा समावेश होतो. शिवाय लैंगिक छळ फक्त कार्यालयातच होऊ शकतो असेदेखील नाही. लैंगिक छळ आणि कामाचे ठिकाण म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे.**



भारतीय राज्यघटनेच्या १४ आणि १५ कलमानुसार, समानतेचा मूलभूत अधिकार आणि कलम २१ नुसार प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळालेला आहे. कामांच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळामुळे या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते. ते रोखण्यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळांविरुद्ध महिलांना संरक्षणा देण्यासाठी, प्रतिबंध करण्यासाठी आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी हा कायदा करण्यात आला. कोणत्याही वयाच्या स्त्रीसाठी हा कायदा लागू होतो. लैंगिक छळामध्ये अनेक बाबींचा समावेश होतो. शिवाय लैंगिक छळ फक्त कार्यालयातच होऊ शकतो असेदेखील नाही. लैंगिक छळ आणि कामाचे ठिकाण म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. हा कायदा फक्त स्त्रियांसाठीच आहे.

### लैंगिक छळ म्हणजे काय

लैंगिक छळामध्ये स्त्रीच्या इच्छेविरुद्ध किंवा अप्रत्यक्ष केल्या जाणाऱ्या कोणत्याही लैंगिक स्वरूपाच्या कृतींचा समावेश होतो. शारीरिक, तोंडी किंवा हावभाव किंवा इतर माध्यमातून स्त्रीच्या इच्छेविरुद्ध केलेली लैंगिक कृती आणि वर्तन याला लैंगिक छळ म्हटले जाते. स्त्रियांना दुय्यम मानून त्यांचा अपमान करणे हादेखील लैंगिक छळ आहे. महिलेच्या इच्छेविरुद्ध केलेली खालील कोणतीही



कृती लैंगिक छळामध्ये धरली जाते.

### १) शारीरिक स्पर्श किंवा जवळीक साधणे

शरीरसंबंधांची मागणी करणे किंवा तशी इच्छा ठेवणे, असुरक्षित स्पर्श करणे, कुरवाळणे, पाठ थोपटणे, चिमटे घेणे, हात लावणे हा लैंगिक छळ आहे. एखाद्या महिलेच्या इच्छेविरुद्ध तिच्या खासगीपणाचे उल्लंघन करणारी कोणतीही शारीरिक जवळीक साधणारी कृती ही लैंगिक छळामध्ये धरली जाईल.

### २) लैंगिक प्रकारातील बोलणे

लैंगिक अर्थाचे शब्द स्त्रीला उद्देशून वापरणे जसे, आयटम, चिकणी, इ.शिवाय पेहराव, लैंगिक अवयव, लिंग या संदर्भाने लैंगिक वाक्ये उच्चारणेदेखील लैंगिक छळ मानला जाईल. एखाद्या स्त्रीला पाहून गाणे गाणे, लैंगिक आवाज काढणं, शिटी वाजवणे किंवा शिव्या उच्चारणे, अश्लील किंवा स्त्री सन्मानाला धक्का पोहचेल असे विनोद, मेसेज करणे किंवा प्रत्यक्ष सांगणे हा लैंगिक छळ आहे. वैयक्तिक आयुष्यातील घटना किंवा खासगी बाबी सर्वांसमोर उघडपणे बोलणे, स्वत:च्या किंवा पत्नीच्या व्यक्तिगत लैंगिक आयुष्याबद्दल चर्चा करणे, लैंगिक गोष्टींचा उल्लेख करून पत्र, ई मेल किंवा फोन करणे, द्वयर्थी शब्द उच्चारणे. इ सर्व लैंगिक छळामध्ये गृहीत धरले जाते.

### ३) लैंगिक साहित्य किंवा तशी सामग्री दाखवणे

अश्लील फिल्म, पुस्तके, फोटो दाखवणे किंवा त्याची मागणी करणे हादेखील लैंगिक छळ आहे.

### ४) कामामध्ये लुडबूड करणे

एखाद्या स्त्रीला आकर्षित करण्यासाठी कामाच्या ठिकाणी अवाजवी महत्त्व देणे किंवा तिच्याकडे दुर्लक्ष करणे, काम करत असताना तिच्या कामाच्या खात्रीबद्दल भीतीदायक वातावरण निर्माण करणे, तिच्या कामामध्ये लुडबूड करणे, विरोध करणे, ज्यामुळे स्त्रीच्या आरोग्यावर आणि सुरक्षितेवर परिणाम होईल असा अमानवी व्यवहार करणे, अपमानास्पद वागणूक देणे याला लैंगिक छळ म्हणतात.

### कामाचे ठिकाण म्हणजे काय?

१) शासकीय, निमशासकीय आणि शासन पुरस्कृत इ. किंवा स्थानिक प्रशासन, सार्वजनिक कंपनी, महामंडळ किंवा सहकारी संस्था संचलित कोणतीही संस्था, उद्योग कार्यालय किंवा शाखा.

२) खासगी क्षेत्रातील संस्था किंवा कंपनीने संचालित केलेली संस्था, उद्योग, सोसायटी, विश्वस्त संस्था, स्वयंसेवी संस्था इ. तसेच व्यापारी, व्यावसायिक किंवा कौशल्य प्रशिक्षण केंद्रे. शैक्षणिक संकुल आणि मनोरंजनाची ठिकाणे. उद्योग आरोग्य किंवा वित्त इत्यादी क्षेत्रात पुरवठा, विक्री, वितरण किंवा अन्य सेवा देणाऱ्या संस्था.

३) रुग्णालये किंवा शुश्रुषागृह.

४) खेळांशी संबधित संस्था, स्टेडियम, वास्तू, स्पर्धेची ठिकाणे मग ती निवासी असो किंवा अनिवासी, खेळ किंवा तत्सम कामासाठी वापरली जाणारी ठिकाणे.

५) कर्मचारी कामासंदर्भात भेट देत असलेली ठिकाणे किंवा नियोक्त्याने पुरविलेली वाहतुकीची साधने.

६) नियोक्त्याचे निवासाचे ठिकाण अथवा घर.

७) असंघटित क्षेत्र - कामाच्या संबंधातील घर ज्याची मालकी एखाद्या व्यक्तीकडे असेल, कोणत्याही प्रकारच्या सेवा पुरवणारी व्यक्ती किंवा स्वयंरोजगार करणारे कामगार





आणि घरकामगार यांचे त्यांच्या
कामानुसार बदलणारी ठिकाणं देखील यामध्ये समाविष्ट आहेत.

## कायद्यातील व्याप्ती आणि कार्य समजून घेण्यासाठी त्यातील इतर व्याख्या

१) पीडित/तक्रारदार महिला कामाच्या ठिकाणी संपर्कात येणारी कोणत्याही प्रकारची स्त्री तक्रार दाखल करू शकते.

२) घर कामगार घरकाम करण्यासाठी थेट किंवा एखाद्या संस्थेमार्फत तात्पुरत्या/ कायम स्वरूपी, अर्धवेळ पूर्णवेळासाठी नेमलेली स्त्री घरकामगार समजली जाईल. मात्र ती स्त्री घरमालकाच्या कुटुंबाची सदस्य असता कामा नये.

३) कर्मचारी- नियमित, तात्पुरती, रोजंदारीने किंवा कंत्राटी पद्धतीने नेमणूक केलेली व्यक्ती कर्मचारी या व्याख्येत बसते. कामाच्या ठिकाणी प्रशिक्षणासाठी किंवा ऑडिटसाठी येणारी व्यक्ती देखील कर्मचारी मानली जाईल. मुख्य मालकाला माहीत नसताना एखाद्या कंत्राटदाराने कामासाठी नेमलेली व्यक्ती कर्मचारी धरली जाईल. पगारी, बिनपगारी, ऐच्छिक काम करणाऱ्या व्यक्तीला कर्मचारी म्हटले जाईल.

४) मालक अथवा नियोक्ता- कोणत्याही कंपनीचा मालक किंवा कामाच्या ठिकाणी व्यवस्थापन, निरीक्षक किंवा नियंत्रण करण्याची जबाबदारी असलेली कोणतीही व्यक्ती, मंडळ किंवा समिती यांना मालक/नियोक्ता समजण्यात येईल, संस्थेसंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्यास व अंमलात आणण्यास जबाबदार असेल अशा व्यक्तींना मालक म्हणता येईल. जी व्यक्ती घर कामगारला कामाला लावत असेल आणि तिच्या कामाचा लाभ घेत असेल अशा व्यक्तीला मालक किंवा नियोक्ता म्हणता येईल.

## तक्रार निवारण समितीची स्थापना

तक्रार निवारण समितीची स्थापना दोन पद्धतीने होते. जिथे दहापेक्षा जास्त कर्मचारी असतील तिथे अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करावी लागते. जिथे दहापेक्षा कमी कर्मचारी आहेत अशा कामाच्या ठिकाणी संबंधित स्त्रियांसाठी स्थानिक तक्रार निवारण समिती जिल्हाधिकाऱ्यांनी स्थापन करणे आवश्यक आहे. या समित्यांच्या कामकाजासंदर्भामध्ये कायद्याने काही व्याख्या स्पष्ट केल्या आहेत.

## अंतर्गत तक्रार निवारण समिती

प्रत्येक आस्थापना प्रमुखाने अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करणे अनिवार्य आहे. अशी तक्रार निवारण समिती प्रत्येक शाखेमध्ये करणे गरजेचे आहे. समितीची स्थापना करण्यासाठी पुढील बाबी आवश्यक आहेत.

१) समितीच्या अध्यक्षपदी त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून वरिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या महिलेची नेमणूक करावी, वरिष्ठ महिला उपलब्ध नसेल तर त्याचा मालक/ नियोक्त्याच्या अन्य शाखा किंवा कंपनीतील वरिष्ठ महिलेची अध्यक्षपदी नेमणूक करावी. मालक किंवा आस्थापना प्रमुख या समितीचा अध्यक्ष असता कामा नये.

२) कर्मचाऱ्यांमधून कमीत कमी दोन सदस्य असे नेमण्यात यावेत ज्यांची महिलांच्या प्रश्नांवर बांधीलकी असते व ज्यांना समाजकार्याचा अनुभव असेल किंवा कायद्याची माहिती असेल.

३) स्वयंसेवी संस्था किंवा संघटनांमधून एक सदस्य घेणे आवश्यक आहे.त्या सदस्याची महिलांच्या प्रश्नांशी बांधीलकी असेल तसेच लैंगिक छळाच्या मुद्याबाबत जाण असेल. शिवाय स्वयंसेवी संस्थेमधून घेण्यात आलेल्या सदस्याला मालक/नियोक्त्याकडून ठरावीक फी किंवा

भत्ता देता येऊ शकतो.

४) समितीमध्ये किमान ५० टक्के सदस्य महिला असल्या पाहिजेत, अध्यक्ष व समितीचे अन्य सदस्य त्यांची नेम णूक झाल्यापासून जास्तीत जास्त ३ वर्षे त्या समितीवर काम करतील.

५) अध्यक्ष किंवा एखाद्या सदस्यावर गुन्हेगारी स्वरूपाची किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरू असेल तर अशा सदस्याला समितीवरून काढण्यात येईल व रिक्त जागा नियमाप्रमाणे भरण्यात येईल.

## स्थानिक तक्रार निवारण समिती

प्रत्येक जिल्हयात कायद्यांतर्गत नेमणूक झालेल्या जिल्हा अधिकाऱ्याने स्थानिक तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना लैंगिक छळाच्या तक्रारी नोंदवण्यासाठी स्थानिक तक्रार निवारण समिती उपलब्ध असते. शिवाय संघटित क्षेत्रातील मालकाच्या/ नियोक्त्याच्या विरोधात तक्रार करायची असेल अशा तक्रारी स्थानिक तक्रार निवारण समितीकडे नोंदवता येऊ शकतात. अंतर्गत तक्रार समितीची स्थापना झालेली नसेल किंवा कामकाज कायदेशीर तरतुदीप्रमाणे होत नसेल तर अशा तक्रारीदेखील जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदवता येतात. शिवाय नेमून दिलेल्या जिल्हा अधिकाऱ्याची प्रत्येक जिल्हयात अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समि ती यांच्या कामकाजांची देखरेख करणे, त्यांचे वार्षिक अहवाल स्वीकारणे आणि त्याच्या कामकाजाचे मूल्यम पन करणे ही प्रमुख जबाबदारी असते.

## समितीची स्थापना करण्यासाठी पुढील बाबी आवश्यक आहेत

१) सामाजिक क्षेत्रात काम करणारी प्रख्यात महिला अध्यक्ष म्हणून नेमण्यात येईल.

२) सबंधित जिल्हायातील तालुका, प्रभाग, नगर परिषद या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या महिलांना सदस्य नेमण्यात येईल.

३) समाज कल्याण अधिकारी किंवा जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी यांची सदस्य सचिव म्हणून नेमणूक करण्यात येईल.



४) कायद्याचे तज्ज्ञ असणारी एक व्यक्ती नेमण्यात येईल.

५) तसेच निमसरकारी संघटनेतील एक व्यक्ती नेमण्यात येईल.

६) समितीचा कार्यकाल तीन वर्षांचा असेल. तीन वर्षानंतर नवीन सदस्यांची नेमणूक केली जाईल.

७) समितीतील कोणत्याही सदस्य तक्रारदार महिलेची, साक्षीदाराची, आरोपीची किंवा केससंदर्भात कोणताही माहिती प्रकाशित, प्रसारीत किंवा सार्वजनिकरीत्या उघड करेल त्यास समितीकडून काढले जाईल.

८) समितीमधील सदस्यास एखाद्या अपराधासाठी शिक्षा झाली असेल किंवा शिस्तभंग कारवाईत ती व्यक्ती दोषी असेल किंवा पदाचा गैरवापर केला तर अशा सदस्यास समितीतून काढले जाईल.

९) समितीमधील सदस्यांना कामकाज चालण्यासाठी निर्दे शित केलेली फी किंवा भत्ता दिला जाईल.

१०) कायद्यांतर्गत नेमणूक झालेल्या जिल्हा अधिकाऱ्याकडे किंवा समाज कल्याण अधिकारी किंवा महिला आणि बाल विकास अधिकारी यांच्याकडे थेट तक्रार देता येऊ शकते.

## अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समितीच्या कामाचे स्वरूप

१) समितीच्या नियमित बैठका होणे गरजेचे आहे.

२) समितीच्या कोणत्याही सदस्याकडे लैंगिक छळाची तक्रार आल्यास समितीची बैठक बोलवण्यात येईल.

३) समितीचे अध्यक्ष लेखी सूचनेद्वारे किंवा ई मेलद्वारे सदस्यांना बैठकीसाठी बोलवतील.या सूचनेची प्रत फाइलमध्ये ठेवण्यात येईल.

४) बैठकीतील कामकाजविषय अध्यक्ष ठरवतील आणि सर्व

सदस्यांना कळवतील.

५) समितीकडे आलेल्या सर्व तक्रारी गोपनीय राहतील आणि त्याबद्दल समितीच्याबाहेरच्या व्यक्तींना त्यांचे तपशील देणार नाहीत.

६) समितीचे कामकाज दिवाणी न्यायालयाप्रमाणे चालेल.

७) कामकाज जलदगतीने केले जावे याचे बंधन समितीला असेल.

८) समितीच्या सदस्यांनी तक्रारादार महिलेला अर्ज लिहिणे, समुपदेशन करणे तसेच पोलिस कारवाईमध्ये सर्वतोपरी मदत करणे अपेक्षित आहे.

९) समितीच्या सदस्यांची नावे आणि संपर्क क्रमांक संस्थेच्या कार्यालयात सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावावेत तसेच वेबसाइटवर देखील प्रसिद्ध करावीत.

१०) लैंगिक छळाबाबत आणि तक्रार निवारणासंबंधी जाणीवजागृती, प्रशिक्षण आणि अशा घटनांना आळा बसावा यासाठी तक्रार निवारण समितीने संस्थेच्या भरती प्रक्रियेमध्ये अशा सत्रांचा समावेश करता येऊ शकतो.

११) समितीच्या प्रत्येक बैठकीचे इतिवृत्तांत ठेवण्यात येतील. प्रत्येक तक्रारीचे दस्ताऐवज राखून ठेवले जातील.

१२) समितीच्या कामाचा वार्षिक अहवाल जिल्हा अधिकाऱ्याकडे जमा करणे बंधनकारक आहे.

## तक्रारीसंदर्भात महत्त्वाच्या गोष्टी

तक्रारदार महिलेने अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीकडे घटना घडल्यानंतर तीन महिन्यांच्या आत किंवा शेवटची घटना घडल्याच्या तीन महिन्यांच्या आत लेखी तक्रार करावी. तक्रादार महिलेला मानसिक दबावामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे शक्य नसल्यास तिने तसे सबंधित अधिकाऱ्यांना कळवावे. अशा महिलेला तिने अर्ज केल्यास तीन महिन्यांची मुदत वाढवून देता येऊ शकते. टेलिफोन, ई मेलद्वारे तक्रारदार महिलेची शारीरिक किंवा मानसिक क्षमता नसल्यास किंवा तिचा मृत्यू झाल्यास तिचा कायदेशीर वारस किंवा अन्य नेमलेली व्यक्ती तिच्यावतीने तक्रार दाखल करू शकते.

तक्रारदार महिलेने इच्छा व्यक्त केल्यास तडजोड केली जाऊ शकते. मात्र आर्थिक देवाणघेवाणीच्या आधारे कोणतेही तडजोड न करता योग्य ती कारवाई करण्याची ग्वाही समितीकडून दिली जाणे आवश्यक आहे.

तडजोड घडून आल्यानंतर पुढील अहवाल तयार करून नियोक्त्यांना किंवा जिल्हा अधिकारी यांना लेखी माहिती देणें आवश्यक आहे. तसेच, तडजोडी किंवा निर्णयाच्या प्रती तक्रारदार महिला व आरोपी यांनादेखील दिल्या पाहिजेत.

## चौकशी प्रक्रियेच्या गुप्ततेबाबत

१) तक्रारदार महिला व साक्षीदार यांचे नाव, पत्ता, ओळख किंवा त्या संदर्भाने येणारी कोणतीही माहिती गुप्त ठेवावी लागेल. प्रसार माध्यमांना देखील छापण्यास देऊ नये किंवा चर्चा करण्याकरिताही देऊ नये.

२) तक्रार आणि चौकशी कामकाजातील मजकूर प्रकाशित अथवा जाहीर करण्यास बंदी आहें. कायद्यातील कलम १६ नुसार अशी माहिती दिली गेल्यास त्या व्यक्तीवर सेवानियमांनुसार कारवाई केली जाईल.

३) माहितीचा अधिकार कायदा, २००५ मधील कलम ९ नुसार कोणी माहिती उपलब्ध करून द्यावी असे सुचवले तरीही या कायद्यानुसार ती दिली जाऊ शकत नाही.

## तक्रारींची चौकशी

१) तक्रारदार महिलेने दिलेला अर्ज लैंगिक छळाच्या व्याख्येनुसार आहे की नाही हे समितीने तपासणे आवश्यक आहे. अर्जामध्ये छळाच्या घटनेच्या स्पष्ट उल्लेख केला आहे की नाही याची खातरजमा करावी.

२) तक्रारदार महिलेने समितीकडे अर्जाच्या सहा प्रती देणे बंधनकारक आहे.

३) तक्रारदार महिलेचा अर्ज आल्यावर सात दिवसांच्या आत समितीने प्रतिवादीला नोटीस द्यावी. तसेच नोटीशीसोबत महिलेच्या अर्जाची प्रत जोडावी. प्रतिवादीने नोटीस आणि अर्ज मिळाल्यानंतर दहा दिवसांच्या आत उत्तर देणे अपेक्षित आहे. सोबत संबंधित कागदपत्रे जोडणे अपेक्षित आहे.

४) चौकशीकरीता किमान तीन सदस्यांची आवश्यकता आहे. यामध्ये अध्यक्ष, बाहेरील तज्ज्ञ व्यक्ती असणे बंधनकारक आहे.

५) सर्वांत प्रथम तक्रारदार महिलेची चौकशी केली जाईल. त्यानंतर प्रतिवादीची चौकशी केली जाईल.

## यानंतर साक्षीदारांची चौकशी केली जाईल.

६) जाब देणारी व्यक्ती कर्मचारी असल्यास त्या आस्थापनाच्या सेवा नियमानुसार/ या कायद्याच्या नियम आणि धोरणांनुसार चौकशी सुरू होईल.

७) तक्रारदार घरकामगार किंवा असंघटित कामगार असेल तर त्यांनी प्रथम स्थानिक तक्रार निवारण समितीकडे तक्रार द्यावी. भारतीय दंड संहित कलम ५०९ अथवा अन्य योग्य कलमानुसार तक्रार नोंदविल्यापासून ७ दिवसांच्या आत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवावा. या तक्रारीबाबत कोणतेही तडजोड झालेली नसल्याचा निर्वाळा तक्रारदाराने दिला पाहिजे.

८) दोन्ही पक्षकारांना एकमेकांनी दिलेल्या जबाबांची प्रत देण्यात येईल. जेणेकरून त्यांना त्यांची उत्तरे देता येतील.

९) तक्रारदार आणि प्रतिवादी व्यक्तीने पुरावे आणि साक्षीदार यांची माहिती पुरवावी. ज्यामुळे चौकशी योग्य दिशेने नेता येईल. तक्रारदार महिलेची तक्रार पुराव्याआभावी खोटी ठरणार नाही.

१०) तक्रारदार महिलेला आवश्यक वाटल्यास तिच्या अर्जानुसार तक्रारदार महिलेची किंवा प्रतिवादीची अन्य कामाच्या ठिकाणी बदली करता येईल. तक्रारदार महिलेला तीन महिन्यांचीदेखील रजा मंजूर करता येऊ शकते. ही रजा तिला अन्यथा मिळणाऱ्या रजेच्या व्यतिरिक्त असावी.

११) घटना घडल्याच्या ठिकाणाची प्रत्यक्ष तपासणी समितीमार्फत करता येऊ शकते.

१२) राज्य घटनेने दिलेल्या या मूलभूत अधिकारांनुसार प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. खालील मुद्दे नैसर्गिक न्यायतत्त्वात समविष्ट होतात म्हणून चौकशी करताना पुढील गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) समता, न्याय, स्पष्टता या तत्त्वांच्या आधारावर समिती काम करेल. कामकाज पूर्वग्रहदूषित नसावे.

२) भारतीय राज्य घटनेतील कलम १४ नुसार कायद्यासमोर प्रत्येकी व्यक्ती ही समान असते.

३) कलम १५ नुसार सामाजिक समानता म्हणजेत स्त्री-पुरुष भेदभाव करू नये.

४) कलम १९ नुसार स्वातंत्र्याचा अधिकार आहे.

५) कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे.

## चौकशीचा अहवाल

१) कायद्यानुसार केली जाणारी चौकशी पूर्ण झाल्यानंतर निर्णयाचा अहवाल तक्रार निवारण समिती,नियोक्त्याला किंवा जिल्हा अधिकारी यांना १० दिवसांच्या आत देईल. त्याची प्रत संबंधित पक्षांना/तक्रारदार आणि आरोपी या दोघांना उपलब्ध करून देईल.

२) अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीच्या चौकशीत आरोपीविरुध्दचा आरोप सिद्ध झाला नाही तर तक्रार निवारण समिती नियोक्त्याला किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याची शिफारस करू शकते.

३) तक्रार निवारण समितीच्या चौकशीत आरोपी विरूध्दचा आरोप सिध्द झाल्यास तक्रार निवारण समिती, नियोक्त्याला किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना खालील शिफारसी करू शकतात

४) आरोपीला अंतर्गत तक्रार समितीने लागू केलेल्या काम ाच्या नियमावलींमधील लैंगिक गैरवर्तणूकीविरूद्ध केल्या जाणाऱ्या शिक्षा त्याला देण्यात याव्यात.

५) तक्रारदार स्त्रीला किंवा तिच्या वारसाला नुकसान भरपाई म्हणून देण्यात येणारी रक्कम आरोपीच्या पगारातून कापली जाईल.आरोपीच्या पगारातून अशी कपात शक्य नसल्यास त्याच्याकडून ती रक्कम थेट घेता येईल.जर आरोपीने रक्कम भरली नाही तर कायदेशीर कारवाई करून थकबाकी वसूल करता येऊ शकते.

६) तक्रार निवारण समितीकडून मिळालेल्या शिफारसीनंतर ६० दिवसांच्या आत त्यांची अंमलबजावणी करणं नियोक्ता किंवा जिल्हा अधिकारी यांना बंधनकारक असेल.

## खोट्या तक्रारीबाबत

१) तक्रारदार महिलेने दिलेली तक्रार किंवा पुरावे खोटे आढळून आल्यास तक्रादार महिलेविरुद्ध कामाच्या सेवा नियमावलीनुसार किंवा समितीच्या शिफारसीनुसार कारवाई करता येईल.फक्त आरोप सिद्ध करता न येणे किंवा पुरावे देणे शक्य नसणे या गोष्टी शिक्षा देण्यासाठी पुरेशा नाहीत.

२) चौकशीच्या दरम्यान एखाद्या दरम्यान एखाद्या साक्षीदाराने खोटी साक्ष किंवा चुकीची माहिती दिली तर तक्रार निवारण समितीच्या शिफारसीनुसार कारवाई करण्याचा अधिकार आहे.

## नुकसान भरपाईबाबत

तक्रारदार महिलेला नुकसान भरपाई मिळण्याचा कायदेशीर अधिकार आहे. ही रक्कम ठरवताना पुढील गोष्टी विचारात घेणे जरूरीच आहे.

१) तक्रारदार महिलेला लैंगिक छळामुळं सहन करावा लागलेला मानसिक त्रास,शारीरिक त्रास, भावनिक दु ख किंवा वेदना यांवा विचार व्हावा. शिवाय शारीरिक आणि मानसिक उपचारांवर झालेला खर्च किती आहे हे तपासून पहावं.

२) लैंगिक छळामुळे सहन करावे लागलेले व्यावसायिक किंवा नोकरीच्या संधीचे झालेले नुकसान पाहावे.

३) नुकसान भरपाई मंजूर करताना प्रतिवादी व्यक्तीचे उत्पन्न व आर्थिक स्तर लक्षात घेणे आवश्यक आहे. शिवाय आरोपीने द्यावयाची नुकसान भरपाई रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्याने देण्याची क्षमता किती आहे हे ही पाहणे आवश्यक आहे.

## शिक्षेबाबत

कायद्यातील व्याख्येप्रमाणे दिलेल्या कामाच्या ठिकाणी कामासंदर्भात उपलब्ध असलेल्या सेवा नियमावलीनुसार शिक्षा देण्यात येतील उदा.

१) लेखी माफी
२) पगारातील कपात
३) वेतनवाढ स्थगिती
४) पदावनती (डीमोशन)
५) पदच्युत करणे (टर्मिशन)
६) करेक्शन मेथड
७) नियमावली/आचारसंहितेनुसार लागू असलेली शिक्षा
८) अंतर्गत किंवा स्थनिक तक्रार समितीला दिवाणी कोर्टाप्रमाणे अधिकार असतील

१) कोणत्याही व्यक्तीला समजपत्र पाठवून बोलावून घेऊन व त्यांन तक्रार निवारण समितीसमोर उपस्थित राहण्यास व जबाब देण्यास कायद्याने भाग पाडले जाईल.
२) आवश्यक ती कागदपत्रे शोधणे किंवा बनविणे
३) आवश्यक ती अन्य कोणतीही कारवाई करणे.

## तक्रारदार महिलेचे अधिकार

- लैंगिक छळ झालेला असूनही त्या स्त्रीला तक्रार करायची नसल्यास तो तिचा अधिकार आहे.
- स्वत चे म्हणणे मांडण्याचा व ते इतरांपर्यंत पोहचवण्याचा अधिकार तक्रारदार महिलेला आहे.
- कायद्यानुसार आणि सेवा नियमावलीनुसार तक्रारदार महिलेला रजा मिळण्याचा अधिकार आहे.
- तक्रारदार महिला स्वतःच्या किंवा प्रतिवादीच्या बदलीची मागणी करू शकते.
- तक्रारदा महिला तक्रार निवारण समितीचा निर्णय जाणून घेण्याचा अधिकार आहे.
- तक्रारदार महिलेला न्याय न मिळाल्यास तो मि ळण्यासाठी विनंती करण्याचा अधिकार असतो.

## मालक किंवा नियोक्त्याचे कर्तव्ये

अ) कायद्यानुसार आस्थापनेमध्ये महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारी निवारण करण्यासाठी अंतर्गत धोरण तयार करण्याची जबाबदारी आहे.

आ) कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित आणि निकोप वातावरण उपलब्ध करून द्यावे. यात कामाच्या ठिकाणी संपर्कात येणाऱ्या व्यक्तीपासूनची सुरक्षा देखील समाविष्ट आहे.

इ) लैंगिक छळाविरुद्ध असलेला कायदा, तक्रार निवारण समिती यांच्या कारवाई बाबत, समिती सदस्यांची नावे आणि संपर्क सर्वांना दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करणे.

ई) या कायद्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा, जनजागृतीचे कार्यक्रम नियमितपणे घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांचा कायदा, त्यातील तरतुदी,अंतर्गत तक्रार निवारण समिती व त्याचे सदस्य याबाबत माहिती द्यावी.

उ) अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीला चौकशी, बैठक इ. कामकाज करण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

ऊ) अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीसमोर प्रतिवादी व साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी समितीला सहकार्य करावे.

ए) तक्रारीच्या चौकशीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे व माहिती समितीला उपलब्ध करुन द्यावी.

ऐ) तक्रारदार महिलेला भारतीय दंड संहितेनुसार इतर कायद्यांची मदत घ्यायची असेल तर तिला सर्वतोपरी सहकार्य करणं.

ओ) लैंगिक छळ करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा.ती व्यक्ती कर्मचारी असल्यास त्याची लैंगिक छळाची कृती ही गैरवर्तणूक आहे असे मानून त्याच्याविरुद्ध कामाच्या नियमावलीत गैरवर्तणुकीबाबत असेलली कारवाई सुरू करावी.अंतर्गत तक्रार निवारण समिती वेळेत कारवाई करत आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवावं.

अ) कंपनीत नोंद झालेल्या तक्रारी, आणि त्यावरील कारवाईबाबतची माहिती नियोक्त्याने आपल्या कंपनीच्या वार्षिक अहवालात सादर करावी.कंपनीतर्फे जर असा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला जात नसेल तर कंपनी हा अहवाल जिल्हा अधिकाऱ्यांना देईल.

## जिल्हा अधिकाऱ्यांचे अधिकार आणि कर्तव्ये

१) जिल्ह्यामध्ये असलेल्या सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यासाठी प्रयत्न करणे.

२) अंतर्गत तक्रार समितीच्या कामकाजाचे निरीक्षण आणि देखरेख करणं, समितीचं कामकाज सुरळईत चालण्यासाठी मदत करण.

३) अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समितीचे वार्षिक अहवाल स्वीकारणे.

४) जिल्ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या आस्थापनांनी कायद्यांच्या नियमानुसार समितीची स्थापना केली नसल्यास दंडात्मक कारवाई करणे.

५) स्थानिक तक्रार निवारण समितीची स्थापन करणे. स्थानिक तक्रार समितीला चौकशी, बैठक इ. काम काज करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

६) जिल्हा अधिकारी यांनी लोकांमध्ये लैंगिक छळाबाबतचा कायदा व महिलांचे अधिकार याबाबत जनजागृतीपर कार्यक्रम राबवावे.

७) जिल्ह्यातील सर्व अंतर्गत आणि स्थानिक तक्रार निवारण समितीचा एक संक्षिप्त अहवाल राज्य शासनाला देतील.

## माहिती मागवण्याचा व रेकॉर्ड तपासण्याचा अधिकार

१) सक्षम शासन, जनहित व महिला कर्मचाऱ्यांचे कामाच्या ठिकाणचे हित लक्षात घेऊन लिखित आदेशांद्वारे आवश्यकता भासल्यास कोणत्याही नियोक्त्याला अथवा जिल्हा अधिकाऱ्यांना बोलावून लैंगिक छळाच्या संदर्भात एखादे रेकॉर्ड किंवा कामाचे ठिकाण तपासण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करेल जो ठरावीक कालावधीत आपला तपासणीबाबतचा अहवाल सादर करेल.

२) प्रत्येक नियोक्ता किंवा जिल्हा अधिकारी, तपासणी अधिकाऱ्याच्या मागणीनुसार संबंधित विषयांची माहिती, रेकॉर्ड व त्याच्या ताब्यातील अन्य कागदपत्रे त्याच्यासमोर सादर करतील.

## कायद्यातील तरतूदीचे पालन न केल्याबद्दल दंड

१) कायदा व त्याचे नियम यांचे पालन न केल्यास नियोक्तायाला ५०,००० रूपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो.

२) एखाद्या मालकास/नियोक्त्याला वरील कोणत्याही कारणाने दंड झाला असेल आणि त्याने पुन्हा त्याच कायद्याचं उल्लंघन केलं तर त्याला आधीच्या दंडाच्या दुप्पट दंड होईल किंवा त्याचा व्यवसाय करण्याचा परवाना रद्द देखील केला जाऊ शकतो.

३) मेट्रोपोलिटन (महानगर दंडाधिकारी न्यायालय) किंवा जुडीशियल कोर्टाच्या खालील कोर्ट या कायद्याच्या अंतर्गत कारवाई करत नाही.

४) या कायद्यातील प्रत्येक गुन्हा अदखलपात्र आहे.

# माटुंगा स्टेशनवर महिला राज

महिला सक्षमीकरणासाठी सध्या शासकीय पातळीवर मोठे प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांचे यश म्हणजे मुंबईतील माटुंगा रेल्वे स्थानक हे पूर्णपणे महिला संचलित झाले आहे. या साठी या स्थानकाचे नाव लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्ये नुकतेच नोंदविले गेले.

हे स्थानक पूर्णपणे महिला संचलित व्हावे, यासाठी मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक शर्मा यांचे जून २०१७ पासून प्रयत्न सुरू होते. मध्य रल्वेने या स्थानकावर ३४ महिलांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे या ठिकाणी तिकीट क्लार्कपासून ते स्टेशन मास्तरपर्यंतची सर्व पदे महिलांकडेच आहेत. १२ जुलै २०१७पासून हे स्थानक पूर्णपणे महिलांच्या ताब्यात देण्यात आले. सध्या या स्थानकावर ४१ महिला कर्मचारी आहेत. त्याचे नेतृत्व स्टेशन मॅनेजर ममता कुलकर्णी यांच्याकडे आहे. ममता कुलकर्णी १९९२ मध्ये मध्य रेल्वेत रूजू झाल्या. त्या वेळी मुंबई विभागात स्टेशन मास्तर बनणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. गेले सहा महिने माटुंगा स्थानकाचा कारभार पूर्णपणे महिलांच्या




ताब्यात आहे.

पुरुष प्रवाशांशी कसे वागायचे, याची कल्पना आता या महिलांना आली आहे. रात्रपाळी करताना काही वेळा त्रास होतो. समाजकंटक, दारूडे, स्थानकाच्या आजूबाजूला फिरतात. मात्र, आम्ही प्रशासन आणि पोलिसांच्या मदतीने त्यांना हाकलून देतो, अशी माहिती एका महिला तिकीट तपासनीसाने दिली.

# पधारो म्हारे गाँव

आतिथ्य हा महिलांचा उपजत स्वभावगुण. या गुणाला व्यावसायिकतेची जोड मिळाली तर...

हाच प्रयोग केला एअरबीनबी (airbnb) या गुजरातमधील स्वयंसेवी संस्थेने. या संस्थेने ग्रामीण भागातील महिलांना प्रशिक्षण दिले आणि पर्यटकांसाठी घरातच भोजन-निवास व्यवस्था सुरू करण्यास सांगितले. ही व्यवस्था जगभर पोहोचावी, यासाठी त्यांना आपल्या सेवेची माहिती इंटरनेटवर पोहोचविण्याचेही प्रशिक्षण दिले. त्यातून या महिलांना रोजगाराचा नवा मंत्र मिळाला आणि सध्या गुजरातच्या ग्रामीण भागातील अनेक महिला या उपक्रमात सहभागी होऊन स्वतःसाठी उत्पन्न कमावत आहेत. हा आकडा सुमारे वीस लाख असण्याची शक्यता आहे. सुरुवातीला महिलांनी यासाठी फार उत्साह दाखवला नाही. मात्र, नंतर त्यांना त्यातील अर्थकारण समजू लागले.

आता तर काही महिलांनी पर्यटकांच्या दृष्टीने घराचे नूतनीकरण केले आहे, त्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# राज्य महिला आयोगाविषयी...

समाजात महिलांचे स्थान सुरक्षित करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत विशेष तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदींच्या आधारेच राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना केली. स्त्रियांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळण्यासाठी कार्यरत राहणे आणि समाजातील त्यांची प्रतिष्ठा वाढविण्याच्या दृष्टीने सरकारच्या धोरणात तरतुदी करण्यासाठी मदत करणे हे आयोगाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. सन १९९३च्या महाराष्ट्र कायद्यातील कलम १५ अंतर्गत २५ जानेवारी १९९३ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. सध्या विजया रहाटकर या आयोगाच्या अध्यक्ष असून, डॉ. मंजूषा मोळवणे या सदस्य सचिव आहेत. या दोन्ही सन्माननीय पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आयोगाचा कारभार सक्षमपणे सुरू आहे. या खेरीज आयोगाच्या अन्य सहा अकार्यकारी संचालक आहेत. राज्याचे पोलिस महासंचालक हे आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतात. राज्य सरकारने आयोगासाठी कर्मचाऱ्यांची ३९ पदे मंजूर केली आहेत.

## आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- एखाद्या विद्यमान कायदा महिलांसाठी अन्यायकारक असल्यास त्या बाबत सरकारला सूचना देणे आणि संबंधित कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

## आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य आयोग ही वैधानिक संस्था असून, तिला दिवाणी न्यायालयाचा दर्जा आहे
- एखाद्या खटल्याशी संबंधित कागदपत्रे कोणत्याही सार्वजनिक कार्यालय वा न्यायालयाकडून आयोग मागवू शकतो
- साक्षीदार आणि कागदपत्रांची तपासणी करण्याबाबत आयोग आदेश देऊ शकतो
- आयोगाशी संबंधित विषयावर सुनावणीला स्थगिती देण्याचाही अधिकार आयोगाला आहे.
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखाद्या राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे

## आयोगाकडून केली जाणारी कामे

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- कार्यशाळा आणि प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे
- जनजागृती मोहिमा राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहिमा राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- तुरुंगांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेश सुविधा उपलब्ध करून देणे
- सरकारला महिलाविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे
- आयोगासाठी तक्रार निवारण मंच स्थापन करणे



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com